न. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा.क्र. १२९०

BVBK-0401290

वडील बंधू

श्री. द. श्री. ( ऊर्फ अण्णा ) दीक्षित, नागपूर

यांस

आदरपूर्वक.

# लेखकाचे निवेदन

'तेजस्वी तारका' या पुस्तकांत मराठ्यांच्या इतिहासांतील सात कीर्तिशाली स्त्रियांच्या जीवनकथा समाविष्ट केल्या आहेत. आठवी चरित्ररेखा मॅडम कामा या आधुनिक क्रांतिकारक स्त्रीची आहे. या कीर्तिशालीनींपैकी कांहींची कीर्ति तळपत आहे, तर कांहींची दरवळत आहे. या सर्व जीवनकथा वाचकांना मनोरंजक, स्फूर्तिदायक व चटकदार वाटतील अशा पद्धतीनें मी लिहिल्या आहेत. अर्थात् मुळांत या स्त्रिया गुणीं, कर्तृत्ववान आणि तेजस्वी आहेत म्हणूनच त्यांच्या जीवनकथा मला समरसून लिहिता आल्या. यांतील ऐतिहासिक स्त्रियांसंबंधीं लिहितांना ऐतिहासिक शुद्धतेकडे मी शक्य तितकें लक्ष पुरविलें आहे. इतिहासाला सोडून किंवा काल्पनिक अशी माहिती मी टाळतां येईल तेवढी टाळली आहे. चरित्रनायिकेची जीवनकथा प्रभावी व सुरस ठरावी यादृष्टीने क्वचित् कोठे काल्पनिक वर्णनाचा आश्रय घ्यावा लागला.

प्रस्तुत पुस्तकांतील जीवनकथांपैकी 'जिजामाता आणि राणी लक्ष्मीबाई' व 'मॅडम कामा' या तीन 'केसरीं'त व बाकीच्या साऱ्या 'माहेर' मासिकांत प्रसिद्ध झाल्या होत्या. 'माहेर'चे संपादक श्री. माधव कानिटकर यांच्या आग्रहासुळे मी त्या लिहिल्या. या पुस्तकांत त्या समाविष्ट करूं दिल्याबद्दल माधवरावांचा व 'केसरी'कारांचा मी आभारी आहे.

विखुरलेले प्रसिद्ध लेख पुस्तकरूपाने एकत्रितपणें वाचकांपुढे आले म्हणजे त्यांची खरी पारख होते व लेखकाच्या परिश्रमाचें सार्थक होतें. 'सह्याद्रि' प्रकाशनाचे श्री. सोनसळे यांनीं ही संधि उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचेहि मी मनःपूर्वक आभार मानतों.

८६५ सदाशिव,<br>
ट्रेनिंग कॉलेजच्या मागे,<br>
पुणें २.<br>
दि. २९-९-१९६२

BVBK-0401290

र. श्री. दीक्षित

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | जिजामाता आणि राणी लक्ष्मीबाई | १ |
| २ | वीरमाता राधाबाई ... | १८ |
| ३ | बाजीरावाची मस्तानी ... | २६ |
| ४ | सती रमाबाई ... | ३५ |
| ५ | पुण्यश्लोक अहल्याबाई ... | ४० |
| ६ | राणी बायजाबाई ... | ४१ |
| ७ | मॅडम कामा ... | ५१ |

# म. श्री. दीक्षित यांची

## इतर पुस्तकें

★

१ पेशवाईंतील रत्नें ( द्वितीयावृत्ति )

२ सत्तावनचे सप्तर्षि ( द्वितीयावृत्ति )

३ पिचलेलीं मनगटें

४ तात्या टोपे

५ जिजामाता

६ पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर

७ मराठी साहित्याचा कारभार

( अर्थात् मराठी साहित्य संस्था : कार्य व स्वरूप )

# आमचीं नवीं प्रकाशनें

| | | |
|---|---|---|
| १ | निवडुंगाचीं बोंडें—ले. शिरूभाऊ लिमये | रु. २=५० |
| २ | हरवलेलं आभाळ—ले. राजा मंगळवेढेकर | रु. २=०० |
| ३ | उंटावरचे शहाणे—ले. श्रीपाद जोशी | रु. २=५० |
| ४ | अपूर्व—ले. माधव कानिटकर | रु. २=०० |
| ५ | किनारा— ” | रु. २=५० |

## • चरित्रें •

| | | |
|---|---|---|
| १ | पं. मोतीलाल नेहरू—ले. राजा मंगळवेढेकर | रु. १=५० |
| २ | डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्— ” | रु. १=०० |
| ३ | राजर्षि पुरुषोत्तमदास टंडन— ” | रु. १=०० |
| ४ | पं. गोविंद वल्लभपंत—ले. रंजन परमार | रु. १=५० |

## आगामी

तऱ्हा : ( कथासंग्रह )—ले. राजा मंगळवेढेकर

सह्याद्रि प्रकाशन, ३९४ नारायण पेठ, पुणें २



# १ : जिजामाता आणि राणी लक्ष्मीबाई

आपल्या मराठ्यांच्या इतिहासांतील कीर्तिशाली आदरणीय स्त्रिया म्हणजे जिजाबाई, येसूबाई, ताराबाई, राधाबाई, गोपिकाबाई, अहल्याबाई, बायजाबाई आणि लक्ष्मीबाई. यांच्यापैकी प्रत्येक स्त्री आपल्यापरी थोर असली तरी त्यांतल्या त्यांत जिजाबाई, अहल्याबाई आणि लक्ष्मीबाई यांच्याविषयीं मराठी माणसाला विशेष आदर नि भक्ति वाटते. ज्येष्ठत्वाचा मुजरा जिजामातेला करावा लागतो, धर्मराजकारणाची शाल अहल्याबाईस द्यावी लागते, तर पराक्रमाचा हार लक्ष्मीबाईच्या गळ्यांत घालावा लागतो. तिघींपैकी अहल्याबाईचें कर्तृत्व अधिक समृद्ध आहे. तिच्या मानाने जिजामाता आणि लक्ष्मीबाई यांचें कर्तृत्व मर्यादित, पण अधिक आकर्षक नि स्फूर्तिदायक आहे.

## सफल मनोरथ-पूर्तीचा सोहळा

योगायोग असा अपूर्व नि आल्हादकारक कीं, १७ जूनला इंग्रजी कालगणनेप्रमाणें, जिजाबाई नि लक्ष्मीबाई यांचें स्मृतिदिन आहेत. या दोघी तेजस्विनी १७ जूनलाच अमर कीर्ति संपादून अमरपदाला निघून गेल्या. ६ जून १६७४ रोजी रायगडावर शिवरायांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्यारोहणाचा अपूर्व समारंभ पाहण्यासाठी रायांनी आपल्या वृद्ध जिजामातेला पाचाडहून मुद्दाम गडावर आणलें होतें. मातेला वंदन करून, तिचा आशीर्वाद घेऊनच महाराज सिंहासनावर आरूढ झाले. हा अनुपम सोहळा पाहून मातेच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. तिचे सकल मनोरथ पूर्ण झाले. शिवरायांनीं दुसऱ्या दिवशीं पालखींत बसवून तिला पाचाडच्या वाड्यांत पोंचविलें. मातु:श्रींनी या वेळीं पंचाहत्तरी ओलांडली होती. त्या अतिशय थकल्या होत्या. हाच थकवा वाढत जाऊन ज्येष्ठ वद्य ९, शके १५९६ बुधवार दि. १७ जून १६७४ रोजी शिवरायांची आणि साऱ्या महाराष्ट्राची मातु:श्री निजधामास गेली. राज्याभिषेकाच्या अकराव्या दिवशींच महाराजां-वर मातृवियोगाचें दु:ख कोसळलें. ' निश्चयाचा महामेरु आणि बहुतजनांचा आधारू ' छत्रपति, आयुष्यांत कधी रडला नाही इतका आपल्या मातेच्या निधनानें रडला-आणि थोड्या दिवसांनी पुन्हा कर्तव्यालाहि लागला.

## निंबाळकरांनी पितृऋण फेडलें

रायगडच्या पायथ्याशीं पाचाड या नांवाचें एक खेडें आहे. गडावरील हवापाणी मातेला मानवणार नाही म्हणून शिवरायांनी या पाचाडांत तिच्यासाठी एक स्वतंत्र गढी ( वाडा ) बांधली होती. पाचाडास पूर्वी बाजारपेठ होती. गडावर बरेचसें सामान येथून जाई. येथील वाड्यांतच जिजामातेचें उर्वरित आयुष्य गेलें. वार्धक्यामुळें ती थकली होती. कोणीं विचारपूस केली तर तेवढ्यापुरती ती कारभारांत लक्ष घाली. एरवींचा वेळ देवधर्मांत नी पुराणश्रवणांत घालवी. मातु:श्रींच्या येथल्या खर्चाची शिवरायांनी स्वतंत्र व्यवस्था केली होती. तिच्या सुखसोयीत रायांनी कांहीं कमी पडूं दिलें नाही. मातु:श्री जिजाईस ज्या ठिकाणीं चंदनाची चिता रचून अग्नि देण्यांत आला त्या ठिकाणीं छत्री उभारलेली होती. बरींच वर्षें आम्हां मराठ्यांना ती अज्ञात होती. चालू शतकांत तिचा शोध रायगड

तीने लावला. पाचाड गांव आज तीन ठिकाणीं विखुरलेलें आढळतें. डाची चढण लागते तिथे चारसहा घरें आहेत. इथून डावीकडे वळसा घातला की, कांही नवबुद्धांचीं घरें लागतात. तिथून पश्चिमेच्या अंगाला प्राथमिक शाळेची इमारत आहे. ती ओलांडली की, एक लहान ओढा नि विहीर लागते. या ओढ्याच्या पलीकडेच जिजामातेची दगडी छत्री उभारलेली दिसते. पूर्वी ही पडीक, उपेक्षित अवस्थेंत होती. पण सुमारें वीस वर्षांपूर्वी फलटणचे राजे निंबाळकर यांनी तिचा मुळाबरहुकूम जीर्णोद्धार केला आणि एक प्रकारें पितृऋण फेडलें.

## जबर कर्तव्यनिष्ठा

जिजामातेची थोरवी वर्णन करण्यास शब्द खरोखर अपुरे आहेत ! शिवकालीन जयराम पिंड्ये, कवींद्र परमानंद, गागा भट्ट इत्यादि पंडित कवींपासून तों अलीकडील सावरकर, गोविंदादि राष्ट्रकवींपर्यंत अनेक प्रतिभावंतांनी नि विद्वानांनी तिची थोरवी गाइली आहे. वीरपत्नी आणि वीरमाता या नात्यांनी जिजाईचें वर्तन आदर्श होतें. पतीवर रागवावें-रुसावें अशी परिस्थिति असूनदेखील तिने कधी शहाजीराजांचा राग केला नाहीं. उलट, त्यांना देवासमान मानून त्यांच्या दूरदेशीच्या मृत्यूची वार्ता कळतांच ही पतिव्रता सती जाण्यास निघाली. ‘ मातुःश्री अग्निप्रवेश करीत होती. तिच्या मांडीवर बैसोन गळां मिठी घालून आण घालून ( राजियांनी ) राहविलीं. आपला पुरुषार्थ पाहावयास कोणी नाही. तूं जाऊं नकोस. म्हणून मोठा यत्न करून राजियांनी व सर्व थोर लोकांनी राहविली. ’ बालहट्टापुढे आणि राजहट्टापुढे पतिव्रतेचें व्रत ढळले ! कारण जिजाबाई केवळ पतिव्रता नव्हती. तर ध्येयनिष्ठ आणि कर्तव्यनिष्ठुर माता होती. पुत्राच्या पुरुषार्थावर तिचा जबर विश्वास होता. त्या पुरुषार्थाची वाटचाल अद्याप संपलेली नव्हती, मायलेकरांचें ध्येय अद्याप सिद्धीस जावयाचें होतें. स्वराज्याचा अरुणोदय पाहिल्याविना तिला डोळे मिटावयाचे नव्हते. पुत्राच्या राज्यारोहणाच्या निमित्ताने तो अरुणोदय तिने ‘ याचि देहीं याचि डोळा ’ पाहिला आणि मगच आपले नेत्र पैल तीराकडे लावले.

वीरता, धीरता, समजूतदारपणा, सोशिकपणा, प्रेमळपणा, आणि विनय या गुणांची जिजामाता खरोखर मूर्ति होती. बालपणीं तिने पुत्रावर जे

संस्कार केले, शिकवण दिली, त्यामुळेच तो स्वाभिमानी, शूर आणि ऽ
वर्तनी निघाला. शिवाजीच्या मोठेपणीसुद्धा तिचें मार्गदर्शन चालू होतें.
शिवाजीराजे कोणत्याहि आणीबाणीच्या प्रसंगीं मातेचा आशीर्वाद नि सल्ला घेत. पुत्राइतकेंच प्रजेविषयी जिजामातेच्या अंतःकरणांत वात्सल्य होतें. 'शिवकालीन पत्रसारसंग्रहां'त दहाबारा पत्रें अशी आहेत की, त्यांवरून तिचें कारभारविषयक धोरण नि योग्यता दिसून येते. 'गृहिणी' या नात्यानेसुद्धा तिचें वर्तन आदर्श होतें. सासू, दीर, सुना नातवंडें यांनी गजबजलेल्या घरांत ती माऊली सावलीप्रमाणे नांदत होती. सुनांना तिचा धाक वाटत नसे, तर आदर वाटे. निंबाळकरांचें शुद्धीकरण, बालसंभाजीचें लालनपोषण, अफजलखान वध, पन्हाळ्याचा वेढा, शिवरायांचें आगऱ्यास प्रयाण इत्यादि घटनांवरून तिच्या तेजस्वी कर्तृत्वावर स्वच्छ प्रकाश पडतो.

## मुक्तकंठाने स्तवन

कर्नाटकांत शहाजीराजांच्या पदरीं जयराम पिंड्ये नामक कवि होता. 'राधामाधव विलासचंपू' या काव्याच्या एकादश उल्लासांत जिजाईची कीर्ति त्याने पुढील शब्दांत गाईली आहे—

**जशी चंपकेशीं खुले फुल्लजाई । भली शोभली ज्यास जाया जिजाई ॥**
**जिचे कीर्तिता चंबु जंबुद्विपाला । करी साउली माउलीसी मुलाला ॥**

परमानंद आणि गागाभट्टाने केलेली तिची प्रशंसा अशीच मार्मिक आहे. न्यायमूर्ति रानडे आणि भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांच्यासारख्यांनी जिचें मुक्तकंठाने स्तवन केलें, तिच्या थोरवीबद्दल आणखी किती लिहावें? कै. डॉ. बाळकृष्ण यांनी 'शिवाजी दी ग्रेट' या आपल्या ग्रंथांत जिजाबाईबद्दल जे अर्थपूर्ण शब्द लिहिले तेवढे देऊन हें पुण्यस्मरण संपवितों—

*In one word, she had the head of a man over the shoulders of a woman.* She remained a guide, philosopher, and friend to Shivaji throughout her life. She anxiously watched the rising sun of the glory of her son and was fortunate to witness its climax in the form of his coronation as an independent king and an ornament of the Kshatriya race.



## आणि ही वीरांगना

१७ जूनला दुसरें पुण्यस्मरण करावयाचें तें झांशीच्या रणशूर राणी लक्ष्मीबाईचे. १७ जून १८५८ रोजीं ग्वाल्हेरच्या किल्ल्यानजीक लक्ष्मीबाई इंग्रजांशीं लढाई लढतां लढतां घायाळ होऊन मृत्युमुखीं पडली. इंग्रजांची फळी फोडून राणी बाहेर पडली होती. ब्रिगेडियर स्मिथने तिचा पिच्छा पुरवला. विजयाची आशा राणीने यापूर्वींच सोडली होती. पळतां पळतां राणीने रामचंद्रराव देशमुखास बजावलें की 'रणांत मी पडलें तर माझ्या देहाला फिरंग्यांचा स्पर्श होऊं होऊं देऊं नका.' राणी निग्रुद्वेगाने पुढे जाते तों पाठीमागे असणारी तिची मंदार दासी शत्रूची गोळी लागून धरणीवर कोसळली. आणखी पुढे जाते तो ओढा आडवा आला. समोर ओढा आणि मागे शत्रू, अशा आपत्तीत सापडलेल्या राणीने लगाम खेचून घोडा भरधाव फेकण्याचा यत्न केला. पण घोडा बिथरला. त्याला राणीच्या जिवांतील घालमेल कशी कळणार ? इतक्यांत इंग्रजांची आघाडीची तुकडी राणीजवळ येऊन

ठेपली. त्या तुकडीतील एका स्वाराने राणीच्या गळ्यातील कंठ्याच्या लोभाने तिच्या डोक्यावर तलवारीचा सपकन् वार केला आणि हाय ! त्या घावाने घायाळ होऊन, रक्तबंबाळ होऊन राणी खाली कोसळली ! ती कोण होती याची पर्वा न करतां ते यमदूत पसार झाले. त्यांचीं तोंडें वळतांच रामचंद्ररावाने राणीला उचलून जवळच्या एका झोपडींत नेलें. तिचा प्राण निघून गेला होता. झोपडीजवळ गवताची एक गंजी होती. ती पेटवून रामचंद्ररावाने राणीच्या अनमोल देहास अग्नि दिला !

## पवित्र नि प्रेरक तीर्थस्थान

ग्वाल्हेर स्टेशनवरून लष्कर भागांत जाऊं लागलें की, रस्त्याच्या उजव्या बाजूस लक्ष्मीबाईंचे वृंदावन लागतें. त्या वृंदावनावर कविवर्य तांब्यांच्या—

**कडाकडा कडाडे बिजली**
**शत्रुचीं लष्करें थिजलीं**
**मग कीर्तिरूपें उरलीं**
**ती पराक्रमाची ज्योत,**
**मालवे इथे झांशीवाली**

अशा गौरवपूर्ण पंक्ति कोरल्या आहेत. अलीकडे वृंदावनाच्या पार्श्वभागीं लक्ष्मीचा अश्वारूढ आणि युद्धसन्मुख असा पुतळा उभारलेला आहे. दिल्लीच्या मार्गावरील बुंदेलखंडांतील ग्वाल्हेरीचें हें धारातीर्थ आम्हां मराठ्यांना तीर्थ-क्षेत्राइतकेंच पवित्र आणि प्रेरक वाटते.

राणी धारातीर्थीं पतन पावली त्यावेळीं तिचें वय अवघें साडेतेवीस होतें. मोरोपंत तांब्यांची मनु उर्फ छबेली ही बालपणापासूनच मोठी चुणचणीत नि तेजस्वी मुलगी होती. बाराव्या वर्षी झांशीच्या अधिपतीशीं— गंगाधरराव नेवाळकरांशीं तिचा विवाह झाला आणि ती झांशीची राणी लक्ष्मी झाली. १८५१ सालीं राणीला पुत्ररत्न झालें. पण तीनच महिन्यांची काळानें तें हिरावून नेलें. पुत्रसंततीच्या अभावीं गंगाधरराव बेचैन झाले. शेवटीं निरुपायाने आनंदराव ऊर्फ दामोदर यास त्यांनी दत्तक घेतलें. पण इंग्रजांनी हा दत्तक नामंजूर केला. इतकेंच नव्हे तर, गंगाधररावांच्या मृत्यूनंतर ( २१-११-१८५३ ) झांशी संस्थान खालसा केलें ! मग मात्र लक्ष्मीबाईनें

तेजस्विनीचा अवतार धारण केला. इंग्रजांनी देऊं केलेलें पेन्शन तिने ठोकरून दिलें आणि त्यांना स्वच्छ बजावलें की, ' नहीं, मेरी झांशीं नहीं दूंगीं ' ! इंग्रजांनी राणीला अन्य प्रकारेंसुद्धा दुखाविलें होते. राणीने गोहत्येला बंदी व्हावी म्हणून अर्ज केला होता. तो अर्ज इंग्रजांनी केराच्या टोपलींत टाकला ! मुलाच्या मुंजीसाठी तिने शिलकेतले लाख रुपये मागितले ते जामिनाशिवाय देण्यास इंग्रज तयार होईना. संस्थान खालसा करून तर इंग्रजांनी राणीच्या स्वाभिमानाला दंश केला. राणीला इंग्रजांशीं सलोखा हवा होता. पण इंग्रजांनी तिचा अवमान करून आणि तिची प्यारी झांशी लुबाडून तिला विलक्षण चिडवलें—डिवचलें.

## धुमसता असंतोष

१८५७ च्या स्वातंत्र्यसमराचे वारे वाहूं लागले होते. इंग्रजांच्या धार्मिक आणि राजकीय जुलमाला देशी राजेरजवाडे, हिंदी फौज आणि सामान्य प्रजा कंटाळली होती. असंतोषाचा अग्नि धुमसत होता. तोंच २९ मार्चला मंगल पांड्याने आणि १० मे रोजीं मीरतच्या फौजेने इंग्रजी सत्तेविरूद्ध क्रांतियुद्धाची उठावणी केली. क्रांतीचा वणवा उत्तर भारतांत हां हां म्हणतां पसरला. दिल्ली, कानपूर, लखनौ, बरेली, बिहार, लाहोर इत्यादि ठिकाणीं धामधूम माजली. तात्या टोप्याच्या मदतीने बिठूरचे नानासाहेब नि रावसाहेब पेशवे आणि झांशीची राणी लक्ष्मीबाई यांनीहि स्वराज्य आणि स्वधर्मासाठीं स्वातंत्र्य-समरांत उडी घेतली. ४ जूनला झांशीच्या फौजांनी उठावणी करून इंग्रजांची कत्तल केली; कोंडी केली. राणी लक्ष्मीबाईने त्यांचे नेतृत्व पत्करून संस्थानचा कारभार हातीं घेतला. इंग्रजांशीं युद्ध होणार हें ओळखून किल्ल्यावर युद्धसिद्धता केली. २३ मार्च १८५८ रोजीं इंग्रजांचा झांशीच्या किल्ल्याला वेढा पडला. तदनंतर ४ एप्रिल पर्यंत उभयपक्षांत गोलंदाजी नि खणाखणी चालू होती. राणीनें प्रतिकाराची शर्थ केली. पण अखेर इंग्रजांच्या शिस्तबद्ध व ताज्या दमाच्या सैन्यापुढे नि प्रबल तोफखान्यापुढें तिला हार खावी लागली. छोट्या दामोदराला पाठीशीं घालून शस्त्रधारी पुरुष वेषांत तिनें आपला घोडा काल्पीकडे भरधांव फेकला.

## आशा मावळली, पण धैर्य कायम

इंग्रजांच्या पाठलागाला दाद न देतां राणीचा वायुवेगाने धावणारा घोडा काल्पीला पोंचतांच धाडकन् जमिनीवर कोसळला. पहाटेचा समय होता. रावसाहेब पेशवे, तात्या टोपे आणि राणी लक्ष्मीबाई यांच्या भेटीगांठी झाल्या. तिघांनी बळ एकवटून इंग्रजांशीं लढण्याचा निश्चय केला. झाशींत अंमल आणि दहशत वसवून सर ह्यू रोज आता काल्पीकडे वळला. वाटेंत कुंच येथे राणी लक्ष्मीबाईशीं त्याला सामना द्यावा लागला. त्यानंतर काल्पी-जवळ तुंबळ युद्ध झालें. राणी पठाणी वेषांत घोड्यावर बसून लढत होतीं. सैन्याला उत्तेजित करीत होती. तिचें अंग धुळीने माखलें होतें. पण इथे मागे हटावें लागलें. खुद्द काल्पींतहि त्रिवर्गाला पराभव पत्करून ग्वाल्हेरचा रस्ता धरावा लागला. विजयाची आशा मावळली असली तरी त्यांचें धैर्य खचलें नव्हतें. 'मरूं किंवा मारूं' अशा ईर्षेने रावसाहेब, राणी आणि तात्या आपली कडवी सेना घेऊन ग्वाल्हेरीवर चालून आले.

## देवतातुल्य स्त्री

ग्वाल्हेरच्या फौजेंत आधीच फूट पडल्यामुळे क्रांतिसेनेने तें चुटकीसरशी घेतलें. शिंदे महाराज आणि दिवाण दिनकरराव आग्र्यास पळून गेले; ग्वाल्हेरवर राज्य करण्याची रावसाहेबास मुळीच इच्छा नव्हती. त्यांना फौजेसाठी पैसा हवा होता. ग्वाल्हेरच्या खजिन्यांतून त्यांना तो मिळाला होता. पण त्यांचे पुढचे बेत ठरतात तोंच इंग्रजी सेना ग्वाल्हेरीवर चालून आली. राणी लक्ष्मी आणि तात्या टोपेने १६ व १७ जूनला इंग्रजांशीं चांगली झुंज घेतली, पण विजयश्रीने माळ घातली इंग्रजांना! इंग्रज पलटणीची फळी फोडून राणी बाहेर पडत असतां शत्रूच्या घावाने धारातीर्थी पतन पावली. तिला वीरमरण लाभलें. सर ह्यू रोजसारख्या इंग्रज सेनापतीला तिच्या शौर्याची मुक्तकंठाने प्रशंसा करावी लागली. लक्ष्मीबाईच्या वीरमरणावर वीर सावरकरांनी पुढील भाष्य केलें आहे—

'अशा रीतीने लक्ष्मी लढली. साधी यःकश्चित्, वयाने बावीसतेवीस वर्षांची असेल नसेल! पण गुलाबासारखी मृदुमोहक, चालण्यासवरण्यांतहि अतिशय गोड नि चारित्र्याने अतिशय विशुद्ध अशा या अबलेने, सहसा

पुरुषांमध्येंहि क्वचित् दिसून येणारे संघटनाचातुर्य प्रकट करून आपल्या प्रजेचीं मनें आकर्षून घेतलीं. स्वदेशभक्तीची दिव्य ज्योत तर तिच्या अंतःकरणांत सदोदितच तेवत होतीं. स्वदेशाची प्रतिष्ठा मिरविण्यांत जशी ती अग्रेसर होती तशी ती रणपांडित्यांतहि कुणाला हात धरूं देणारी नव्हती. अशा तऱ्हेची देवतातुल्य स्त्री, कन्या नि राशी म्हणून लाभण्याचें भाग्य क्वचित् एखाद्याच राष्ट्राच्या वांट्याला आलें असेल ! हें भाग्य इंग्लंडलाहि अद्याप लाभलेलें नाहीं.'

ग्वाल्हेर साहित्यसंमेलनाच्या निमित्ताने मी लक्ष्मीबाईच्या लाडक्या झांशीला मुद्दाम गेलों होतों. मला तिथें काय दिसलें ? झांशी शहर जुनें, पसरलेलें आणि कांहीसें पेंगुळलेलेंच भासलें. प्रथम किल्ला पाहण्यास गेलों. त्याच्या दूरदर्शनानेच नेत्रांचें पारणें फिटलें. अंतःकरण आनंदाने नि अभिमानाने भरून आलें. शहराला लागून एका उंच खडकाळ टेकाडावर भक्कम तांबूस तटबंदीचा हा किल्ला अद्याप ताठपणें उभा आहे. त्याच्या पायथ्याशीं लक्ष्मीबाईचा अश्वारूढ असा उंच पुतळा सरकारने उभारला आहे. उंच चबुतऱ्यावर उभारलेला नि पाठीशीं रक्तरंजित किल्ल्याची पार्श्वभूमि असलेला महाराष्ट्रीय वेषांतील हा स्फूर्तिदायक पुतळा बघून प्रत्येक स्वातंत्र्यप्रेमी व्यक्तीचें मस्तक नम्र होतें. किल्ला पाहून झांशीं शहरांत गेलों. शहर बकाल भासलें. मराठी वस्ती थोडी आढळली. सारा हिंदीचा कोलाहल ! राणीच्या राजवाड्यांत शिरलों तों पाउलें पावन झालीं, पण मन उदास झालें. सारीकडे पडझड, रंग उडालेला, नक्षी निखळलेली आणि कंगालांनीं वस्ती केलेली. थोड्या अंतरावर राणी देवदर्शनाला जात असे त्या गणपतिमंदिरांत गेलों. देवळाची दैना आहे. तिथे राहणारें तांबे कुटुंबहि ओढग्रस्त दिसलें. झांशीच्या 'लक्ष्मी'ची ही दैन्यावस्था बघून माझं मराठी मन विषण्ण झालं. पण यालाच म्हणतात, 'काळाचा महिमा' !

* * *



२ :

# वीरमाता राधाबाई

छत्रपति शिवाजी महाराजांची आई जिजाबाई ज्याप्रमाणे एक थोर आदर्श माता आणि राजकारणी स्त्री होऊन गेली, त्याचप्रमाणे थोरले बाजीराव आणि चिमाजीअप्पा यांची आई राधाबाई पेशवे ही एक आगळी तेजस्वी स्त्री म्हणून इतिहासांत प्रसिद्धि पावली. शाहू महाराजांचे पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांची राधाबाई ही पत्नी होय. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र संभाजी व राजाराम यांच्या पक्षांत दुही माजली. या दुहीचा फायदा औरंगजेब बादशहाने घेऊन महाराष्ट्रांत एकप्रकारची बेबंदशाही माजविली. संभाजीराजांना कपटाने कैद करण्यांत येऊन त्यांचा अमानुषपणें वध करण्यांत आला. राजांची पत्नी आणि पुत्र शाहू औरंगजेबाच्या कैदेंत अडकले. कांही वर्षांनी शाहूराजे आपल्या मातोश्रींसह महाराष्ट्रांत आले, आणि राजधानी साताऱ्याहून कारभार पाहूं लागले. पण त्यांना आपल्याच घराण्यांतील लोकांचा विरोध होऊं लागला. याशिवाय

निजामासारखे उघड शत्रूहि त्यांना उपसर्ग देत होते. अशा कठीण समयीं बाळाजी विश्वनाथासारखा कारकुनी पेशांतील हुषार व महत्त्वाकांक्षी मनुष्य पुढे झाला आणि त्याने शाहुमहाराजांचा पक्ष घेऊन धडाडीने त्यांची चाकरी केली. बाळाजीवर महाराजांची फार मर्जी बसली. छत्रपतींचा पेशवा पंतप्रधान बनून बाळाजीने शत्रूंवर जरब बसवली आणि दिल्लीच्या बादशहाकडून शाहुराजांच्या कारकीर्दीस मानमान्यता मिळवून दिली. राजांच्या कारभाराची घडी नीट बसवत असतांनाच हा पहिला पेशवा—बाळाजी विश्वनाथ—२ एप्रिल १७२० रोजीं, दगदगीने सासवड येथे मृत्यु पावला.

बाळाजीनंतर त्याच्या थोरल्या पुत्रास—बाजीरावास-छत्रपतींकडून पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. बाजीराव यावेळीं वीस वर्षांचा होता. पण पित्याबरोबर अनेक लढाया आणि राजकीय उलाढाली त्याने पाहिल्या असल्यामुळे पेशवाईच्या पदाला तो लायक झाला होता. बाळाजी सौम्य—मुत्सद्दी होता. तर बाजीराव शूर-वीर-धीर होता. बापसे सवाई होता. आपल्या पराक्रमाने त्याने मराठ्यांच्या राज्याचा विस्तार केला आणि मराठी सत्तेचा सर्वत्र दरारा बसविला. बाजीरावाच्या विजयी घोडदौडीला त्याच्या धाकट्या भावाची चिमाजी—अप्पाची—सांथ होती. चिमाजी भावाप्रमाणेच शूर, हिंमतबहादूर व चारित्र्यवान् होता. बाजीराव नेहमी लढायांत गुंतला असल्यामुळे चिमाजीला घरचीं कामें पाहावीं लागत. दोघां भावांचें रामलक्ष्मणाप्रमाणे एकमेकांवर प्रेम होतें. त्यांच्या स्वामीनिष्ठेला, पराक्रमाला, बंधुप्रेमाला आणि मातृप्रेमाला मराठ्यांच्या इतिहासांत तरी तुलना नाहीं.

बाजीराव आणि चिमाजीअप्पा या नरवीरांची आई होण्याचें भाग्य जिला लाभलें ती वीरमाता राधाबाई खरोखर धन्य होय. पहिल्या पेशव्यांची पत्नी या नात्यापेक्षा वीरमाता आणि शहाणी, तेजस्वी राजकारणी स्त्री म्हणूनच ती इतिहासांत चमकली. शिवाजीच्या जिजाईनंतर बाजी—चिमाजीचीं-कर्तृत्ववान माता म्हणून राधाबाईच कीर्ति पावली.

अंताजी मल्हार बर्वे ( डुबेरकर ) यांची राधाबाई ही कन्या. तिचा जन्म सुमारें १६८० चा. लग्न बाळाजी विश्वनाथ पेशव्याशीं सुमारें १६८८ सालीं झालें. उभयतांना मुलं किती झालीं याची निश्चित माहिती मिळत नाहीं. तथापि दोन मुलगे आणि दोन मुली यांचीं नांवें प्रसिद्ध आहेत.

थोरला मुलगा विसाजी ऊर्फ बाजीराव इ. स. १७०० साली जन्मला. त्याच्या पाठीवर चार वर्षांनी चिमाजीचा जन्म झाला. मुलगी भिऊबाई त्याच्या आधीची आणि अनुबाई पाठची. त्या अनुक्रमें बारामतीकर नाईक आणि इचलकरंजीकर घोरपडे घराण्यांत दिल्या होत्या. बाजीरावाच्या पत्नीचें नांव काशीबाई होतें. तीं चासकर जोशी यांची मुलगी. तिला बाळाजी ऊर्फ नानासाहेब व रघुनाथराव ऊर्फ राघोबा असे दोन मुलगे झाले. बाळाजीच्या पत्नीचें म्हणजे राधाबाईच्या थोरल्या सुनेचें नांव गोपीकाबाई होतें. ती सासूप्रमाणेच कर्तबगार निघाली. चिमाजीअप्पांची पहिली पत्नी रखमाबाई पेठे घराण्यांतील होती. सदाशिवरावभाऊला जन्म दिल्यानंतर ती वारली. त्यानंतर चिमाजीचें दुसरें लग्न झालें. ही दुसरी पत्नी थत्ते यांचेकडील होती. तिचें नांव अन्नपूर्णा. १७४० सालीं चिमाजीबरोबर ती पुण्याला सती गेली. राधाबाईचा कुटुंबपरिवार हा असा मोटा गोकुळासारखा होता. या कुटुंबांत तीच प्रमुख व कर्ती होती. मुलांसकट सर्वांचे ती लालनपोषण, व मार्गदर्शन करीत होती. सर्वांवर तिची अपार माया होती, आणि सर्वांना तिचा धाक वाटत होता, आदर वाटत होता.

पेशवे कुटुंबांतील कौटुंबिक गोष्टी राधाबाई आणि धाकटा मुलगा चिमाजी यांनाच कराव्या लागत असत. धर्मकृत्यें, सण, लग्नमुंजी, इत्यादि गोष्टी राधाबाई जातीने पाहत असे. स्वतः ती धर्मनिष्ठ होती. ब्रह्मेंद्रस्वामींवर तिची भक्ति होती. पतिनिधनानंतर वडीलकीच्या नात्याने कुटुंबाचा गाडा प्रायः तीच चालवीत होती. तिची राहणी साधी आणि वृत्ति धार्मिक व कडक होती. तिला लिहितां वाचतां येत असे. जरूर पडेल त्या वेळीं तीं राजकारणांतहि लक्ष घालीत असे. या तेजस्वी स्त्रीने कौटुंबिक, सामाजिक व राजकीय गोष्टी कशा अक्कलहुषारीनें पार पडल्या आणि सर्वांवर आपली कशी छाप बसविली हें समजून घेण्यासारखें आहे. पराक्रमी—सत्ताधारी पुत्रांची तिच्या विषयींची मातृ-भक्ति पाहिली म्हणजे या स्त्रीची योग्यता मनावर कायमची ठसते. आंग्रे, निंबाळकर, जाधव इत्यादि सरदार तिला मान देत असत. पेशव्यांचे गुरु ब्रह्मेंद्रस्वामी यांचासुद्धा तिजवर कृपा-लोभ होता. पिलाजी जाधवाने 'तीर्थरूप मातुश्री' असें संबोधून राधाबाईला एकदा 'संक्रमणाची तिलशर्करा' (तीळगूळ) पाठविली होती.

राधाबाईचे गुण आणि कर्तृत्व दर्शविणारीं अनेक पत्रें पेशवे दप्तरांत

उपलब्ध आहेत. यांपैकीं कांहीं राधाबाईला लिहिलेलीं, कांहींत तिचा आदरपूर्वक उल्लेख केलेलीं व कांहीं खुद्द तिने पाठविलेलीं आहेत. कौटुंबिक स्वरूपाच्या पत्रांतून राधाबाईची संसारदक्षता आणि वत्सल भावना चांगली दिसून येते. १७३३ सालीं चिमाजीला लिहिलेल्या पत्रांत 'चिरंजीव सौ. कासीबाई प्रसूत होऊन पुत्र' झाल्याचें ती कळविते. त्यानंतर सूनबाई काशीबाईला पत्र लिहून ती लिहिते कीं, 'आपणांस व चिरंजीव बाळास जतन करणें.' धाकटी सून रखमाबाई होती. तिला माहेरची खुशाली कळविल्याचें एक पत्र उपलब्ध आहे. १७३९ सालीं चिमाजीला पत्र पाठवून नातवंडासाठी 'उत्तम अशा हस्तिदंती व कांचेच्या बाहुल्या' तिने मागवल्या होत्या. धाकटी सूनबाई रखमाबाई वारली तेव्हा तिचा मुलगा सदाशिव लहान होता. आई-विना पोरक्या झालेल्या या सदाशिवाचें पालनपोषण राधाबाईनेच ममतेने केलें. पोरक्या संभाजीचा प्रतिपाळ जसा जिजामातेने केला तसाच सदाशिवाचा राधाबाईने केला. (योगायोगाची गोष्ट म्हणजे संभाजी आणि सदाशिरावभाऊ हे दोघेहि शूर निघाले आणि दोघांनी वीरमरण पत्करलें.) बाजीरावाला पाठविलेल्या एका पत्रांत राधाबाई घरच्या लग्नासंबंधीं विचारविनिमय करते, तर दुसऱ्या एका पत्रांत आपल्या धाकट्या मुलीसंबंधी (भिऊबाई) 'परभारींच घरीं गेल्या' बद्दलची तक्रार करते. भिऊबाईने आपल्या 'तीर्थरूप मातुश्री'ला लिहिलेलें एक पत्र आहे. त्यांत सदोबाकरिता बनोशी व केसरी अशी दोन तिवटें पाठविल्याचा उल्लेख आहे. १७३७ सालीं राधाबाईने समुद्रस्नानाची इच्छा दर्शविल्यावरून आज्ञाधारक चिमाजीने पुतण्यास लिहिलें: 'मातुश्रीबाईस समुद्रस्नान करणें आहे म्हणून पावसाला बोलली होती, याकरिता आमवाशे आलीकडे च्यार दिवस येथें पावणे, सौभाग्यवती कासीबाई वहिनीचा पाय बरा झाला असला तर त्यासहि रवाना करणें. ती आली म्हणजे जनार्दन, रघुनाथ, सदाशिव त्रिवर्गहि येतील. त्यांचें राहणें झालें तर जनार्दन त्याजवळ राहील. मातुश्रींच्या विचारें तूर्त यावेसें नसलें तर कोणासहि पाठवावयाचें प्रयोजन नाहीं.' १७३९ सालीं घरांत सदाशीव-रावाचें लग्न आणि राघोबाची मुंज अशीं दोन कार्यें निघालीं. या प्रसंगीं बाजीराव पेशवा मस्तानी नांवाच्या सुंदर यावनी नर्तिकेच्या संगतींत गुंगला होता. चिमाजीने यावेळचीं सर्व हकिकत मातुश्रीला लिहितो 'माघमासी लग्न

व मुंजीं नेमिली आहे. दोन्ही साहित्यें येकदांच होणार नाहींत. यास्तव वैशाख मासी लग्नाचा व मुंजीचा मुहूर्त आहे कीं नाहीं तें मनांत आणावें. आपले विचारें माघ मासींच उरकून घ्यावें ऐसेंच असिलें तरी साहित्य जसें होईल तसें करूं; बहुत काय लिहिणें, कृपा केलीं पाहिजे. '

राधाबाई शहाणी, करारी व कांहीशी तापट होती. आपल्या वीर पुत्रांच्या मनांत तिने साहसाची व पराक्रमाची बिजें पेरलीं. मुलगे कर्ते झाल्यावर साहजिकच त्यांच्या हिताकडे व वागणुकीकडे तीं जागरूकपणें लक्ष घालत असे. मुलें, सुना, नातवंडें तिच्या अगदी आज्ञेंत असत. तथापि मोठ्या संसारांत कधीमधी भांड्यांची आदळआपट ही व्हायचीच. अशा वेळीं राधाबाई रागावे, वैतागे. ' यात्रेला निघून जातें ' असें म्हणून त्रागा करी. मुलांच्या कारभारांत लक्ष घालून ती सल्लामसलत देई. कांहीं वेळेला तिच्या मनाविरुद्ध गोष्टी घडत, आणि तसें झालें कीं, ती मनाला त्रास करून घेई. १७३९ सालीं तिच्या मनाविरुद्ध अशींच एक गोष्ट घडली. त्यावेळीं चिमाजीने तिला आदबीने पत्र पाठवून ' त्रास करून घेऊं नये ' असें विनविलें. बाजीरावाला मस्तानीची संगत जडल्यावर राधाबाईला आणि चिमाजीला अतिशय दुःख झालें. रावावर ते रुष्ट झालें. मस्तानीच्या संगतीने घराण्याची, जातीची, आणि पेशवाईपदाची बेअब्रू झाली असें सर्वांनाच त्यावेळीं वाटत होतें. पण बाजीराव कांहीं केल्या मस्तानीची संगत सोडेना. शूर मर्दाच्या प्रेमाला कोण बांध घालणार? राधाबाई, चिमाजी व नानासाहेब या तिघांनीं मस्तानीप्रकरणीं पुष्कळ खटपट केली. पण त्यांना अपयश आलें. यावनीच्या संगतीने पुत्राच्या पराक्रमाला कलंक लागल्याने वीरमातेच्या अंतःकरणाला जखम झाली. पुत्राचे सहस्र अपराध पोटांत घालणाऱ्या मृदुल अंतःकरणाने चिमाजीला तिने लिहिलें ' चिरंजीव राजश्री राव याजपाशी बहुत युक्तीच्या विचारें जो विचार करणें तो करून येणें. चालीवरी नजर देऊन जें कर्तव्य तें करावें. ' चिमाजीनें आपल्यापरी थोरल्या भावाला समजावण्याचा पुष्कळ यत्न केला. पण व्यर्थ. बाजीरायाचें मस्तानीचें वेड सुटेना. त्याने आईला लिहिलें 'रायासी चार गोष्टी नर्मतेनें बोललों. सांप्रत पहिल्यापेक्षां बोलून चालून भोजन करून सुखरूप आहेत. देवाची दया आहे तर दिवसेंदिवस संतोषीच होत जातील. चित्तांत मात्र वेध आहे तो कळलाच आहे. '

चिमाजी बाजीरावाचा धाकटा भाऊ असला तरी त्याच्याविषयी बाजीरावाला एक प्रकारचा धाक आणि आदरसुद्धा वाटत असे. दोघे बंधु एकमेकांना जीवापाड जपत असत. प्रकृतीची हेळसांड करून चिमाजी बाजीरावाच्या पराक्रमाला साथ देत असे. अशा वेळीं बाजीला त्याची काळजी वाटे. बाजीरावाने बऱ्हाणपुराहून आईला एकदा निक्षून लिहिले कीं, 'चिरंजीव राजश्री आपास बाहेर जाऊ न द्यावें. वसईकडे पहावयास जाऊं लागतील तरी एकंदर त्याणी न जावें. मातबर सरदार समागमें आहेत त्याजपासून जे मेहनत घेणें ते घेत जावी. आपण त्यांस वरचेवर सांगत जावें.'

बाजीराव आणि चिमाजी ही दोन्ही राधाबाईचीं फुप्पुसें होतीं. मुलांच्या पराक्रमाला उत्तेजन देणारी ही माता त्यांच्या जीवावर प्रसंग गुदरला कीं, अस्वस्थ होई, गहिंवरून जाई, हादरून जाई.

वज्राप्रमाणे कठीण असणारं तिचं मातृहृदय अशा सप्रंगीं वात्सल्यानें भरभरून येई. उन्मत्त निजामाच्या भेटीला बाजीराव जेव्हां प्रथमच निघाला तेव्हां रावाला ममतेने तिने इषारा दिला 'राजश्री रंभाजी निंबाळकर व तुरुज ताजखान यांची भेट जालियानंतर भेटीचा मनसुबा मोडला तर बहुतच उत्तम आहे, नाहीं तरी तुम्ही विचार करून भेटीचा मनसबा मोडे ते गोष्ट करणें. राजश्री आनंदराऊ सोमवंशी सरलष्कर व शंभुसिंग जाधवराव हे दोन्ही सरदार बरोबर नाहींत. तेव्हां भेटीचा मनसुबा मोडे तेच गोष्ट करणें.' वसईच्या विजयानंतर दगदगीने चिमाजीअप्पाजीची प्रकृति खालावत चालली होती. राधाबाईचा त्याच्यावर अति जीव. त्याच्या ढासळत्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून तिनें ब्रह्मेंद्र स्वामींना लिहिलें. 'वैद्य पांचसात आहेत ते उपाय करितात. स्वामींनी ईश्वरापासी संकट घालून चिरंजीवास आरोग्य होय तो उपाय करणार स्वामी समर्थ आहेत.'

सामाजिक व राजकीय बाबतींत राधाबाई कधीकधी पुढाकार घेत असे. तिच्या मताला मोठी किंमत असें. शिवनेरीच्या चितळे नामक किल्लेदाराने राधाबाईला पत्र लिहून एका पुलाच्या बांधकामाची व्यवस्था तिला कळविलीं आहे. १७२९ मध्ये पेशव्याला लिहिलेल्या एका पत्रांत कारभाऱ्याने राधाबाईच्या इच्छेनुरूप हत्तीची मागणी केलेली आढळते. १७४६ च्या सुमारास पुण्यांत एक सामाजिक प्रकरण उद्भवलें होतें. या प्रकरणीं

व मुंजीं नेमिली आहे. दोन्हीं साहित्यें येकदांच होणार नाहींत. यास्तव वैशाख मासी लग्नाचा व मुंजीचा मुहूर्त आहे कीं नाहीं तें मनांत आणावें. आपले विचारें माघ मासींच उरकून घ्यावें ऐसेंच असिलें तरी साहित्य जसें होईल तसें करूं; बहुत काय लिहिणें, कृपा केलीं पाहिजे. ’

राधाबाई शहाणी, करारी व कांहीशी तापट होती. आपल्या वीर पुत्रांच्या मनांत तिने साहसाची व पराक्रमाची बिजें पेरलीं. मुलगे कर्ते झाल्यावर साहाजिकच त्यांच्या हिताकडे व वागणुकीकडे तीं जागरूकपणें लक्ष घालत असे. मुलें, सुना, नातवंडें तिच्या अगदी आज्ञेंत असत. तथापि मोठ्या संसारांत कधीमधी भांड्यांची आदळआपट ही व्हायचीच. अशा वेळीं राधाबाई रागावे, वैतागे. ‘ यात्रेला निघून जातें ’ असें म्हणून त्रागा करी. मुलांच्या कारभारांत लक्ष घालून ती सल्लामसलत देई. कांहीं वेळेला तिच्या मनाविरुद्ध गोष्टी घडत, आणि तसें झालें कीं, ती मनाला त्रास करून घेई. १७३९ सालीं तिच्या मनाविरुद्ध अशींच एक गोष्ट घडली. त्यावेळीं चिमाजीने तिला आदबीने पत्र पाठवून ‘ त्रास करून घेऊं नये ’ असें विनविलें. बाजीरावाला मस्तानीची संगत जडल्यावर राधाबाईला आणि चिमाजीला अतिशय दुःख झालें. रावावर ते रुष्ट झालें. मस्तानीच्या संगतीने घराण्याची, जातीची, आणि पेशवाईपदाची बेअब्रू झाली असें सर्वांनाच त्यावेळीं वाटत होतें. पण बाजीराव कांहीं केल्या मस्तानीची संगत सोडेना. शूर मर्दाच्या प्रेमाला कोण बांध घालणार? राधाबाई, चिमाजी व नानासाहेब या तिघांनीं मस्तानीप्रकरणीं पुष्कळ खटपट केली. पण त्यांना अपयश आलें. यावनीच्या संगतीने पुत्राच्या पराक्रमाला कलंक लागल्याने वीरमातेच्या अंतःकरणाला जखम झाली. पुत्राचे सहस्त्र अपराध पोटांत घालणाऱ्या मृदुल अंतःकरणाने चिमाजीला तिने लिहिलें ‘ चिरंजीव राजश्री राव याजपाशी बहुत युक्तीच्या विचारें जो विचार करणें तो करून येणें. चालीवरी नजर देऊन जें कर्तव्य तें करावें. ’ चिमाजीनें आपल्यापरी थोरल्या भावाला समजावण्याचा पुष्कळ यत्न केला. पण व्यर्थ. बाजीरायाचें मस्तानीचें वेड सुटेना. त्याने आईला लिहिलें ‘रायासी चार गोष्टी नर्मतेनें बोललों. सांप्रत पहिल्यापेक्षां बोलून चालून भोजन करून सुखरूप आहेत. देवाची दया आहे तर दिवसेंदिवस संतोषीच होत जातील. चित्तांत मात्र वेध आहे तो कललाच आहे. ’

चिमाजी बाजीरावाचा धाकटा भाऊ असला तरी त्याच्याविषयी बाजीरावाला एक प्रकारचा धाक आणि आदरसुद्धा वाटत असे. दोघे बंधु एकमेकांना जीवापाड जपत असत. प्रकृतीची हेळसांड करून चिमाजी बाजीरावाच्या पराक्रमाला साथ देत असे. अशा वेळीं बाजीला त्याची काळजी वाटे. बाजीरावाने बऱ्हाणपुराहून आईला एकदा निक्षून लिहिले कीं, 'चिरंजीव राजश्री आपास बाहेर जाऊ न द्यावें. वसईकडे पहावयास जाऊं लागतील तरी एकंदर त्याणी न जावें. मातबर सरदार समागमें आहेत त्याजपासून जे मेहनत घेणें ते घेत जावी. आपण त्यांस वरचेवर सांगत जावें.'

बाजीराव आणि चिमाजी ही दोन्ही राधाबाईचीं फुप्पुसें होतीं. मुलांच्या पराक्रमाला उत्तेजन देणारी ही माता त्यांच्या जीवावर प्रसंग गुदरला कीं, अस्वस्थ होई, गहिंवरून जाई, हादरून जाई.

वज्राप्रमाणे कठीण असणारं तिचं मातृहृदय अशा सप्रंगीं वात्सल्यानें भरभरून येई. उन्मत्त निजामाच्या भेटीला बाजीराव जेव्हां प्रथमच निघाला तेव्हां रावाला ममतेने तिने इषारा दिला 'राजश्री रंभाजी निंबाळकर व तुरुज ताजखान यांची भेट जालियानंतर भेटीचा मनसुबा मोडला तर बहुतच उत्तम आहे, नाहीं तरी तुम्ही विचार करून भेटीचा मनसबा मोडे ते गोष्ट करणें. राजश्री आनंदराऊ सोमवंशी सरलष्कर व शंभुसिंग जाधवराव हे दोन्ही सरदार बरोबर नाहींत. तेव्हां भेटीचा मनसुबा मोडे तेच गोष्ट करणें.' वसईच्या विजयानंतर दगदगीने चिमाजीअप्पाजीची प्रकृति खालावत चालली होती. राधाबाईचा त्याच्यावर अति जीव. त्याच्या ढासळत्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून तिनें ब्रह्मेंद्र स्वामींना लिहिलें. 'वैद्य पांचसात आहेत ते उपाय करितात. स्वामींनी ईश्वरापासी संकट घालून चिरंजीवास आरोग्य होय तो उपाय करणार स्वामी समर्थ आहेत.'

सामाजिक व राजकीय बाबतींत राधाबाई कधीकधी पुढाकार घेत असे. तिच्या मताला मोठी किंमत असें. शिवनेरीच्या चितळे नामक किल्लेदाराने राधाबाईला पत्र लिहून एका पुलाच्या बांधकामाची व्यवस्था तिला कळविलीं आहे. १७२९ मध्ये पेशव्याला लिहिलेल्या एका पत्रांत कारभाऱ्याने राधाबाईच्या इच्छेनुरूप हत्तीची मागणी केलेली आढळते. १७४६ च्या सुमारास पुण्यांत एक सामाजिक प्रकरण उद्भवलें होतें. या प्रकरणीं

राधाबाईने जातीने पुढाकार घेतला व तें मिटवून टाकलें. गोविंद हरी पटवर्धन यांचे घरीं महार जातीची बटीक आढळून आल्यामुळे ब्राह्मणवर्ग कोपला आणि पटवर्धनांवर सामाजिक बहिष्कार टाकण्यांत आला. यावेळीं पेशवा झालेला नानासाहेब साताऱ्यास गेला होता. त्याच्या अनुपस्थितींत राधाबाई बेडरपणें पुढें झाली आणि ब्राह्मणांची समजूत घालून तिने पटवर्धनास प्रायश्चित्त देवविलें. शिष्ट ब्राह्मणांनी प्रथम राधाबाईस विचारलें ' तुम्ही कोण ? आम्हांस प्रभुची आज्ञा हवी.' पण बाईने लगेच जबाब दिला ' आम्ही आज्ञा केली तेच आज्ञा प्रभूची आहे. पटवर्धनास आता उपसर्ग होतां कामा नये.' मग ब्राह्मण गप्प झाले. प्रकरण छत्रपतींच्या कानांवर जाऊं नये म्हणून झालेली सर्व हकिकत तिने लगोलग नानासाहेबाला साताऱ्यास कळविली.

पराक्रमी पुत्रांच्या चढत्या वैभवाच्या काळांत राधाबाईने १७३५ सालीं काशीयात्रा केली. ही यात्रा अनेक कारणांनी इतिहासांत गाजली. या यात्रेचा हेतु केवळ धार्मिक किंवा कौटुंबिक नव्हता. तर त्या यात्रेला एक प्रकारची राजकीय पार्श्वभूमि होती. छत्रपतींच्या आणि पेशव्यांच्या सत्तेचा-पराक्रमाचा दिमाख आणि दरारा उत्तर हिंदमध्यें किती आहे याची एकदा शहानिशा व्हायला हवी होती. राधाबाईच्या यात्रेमुळें ती गोष्ट साध्य झाली. यात्रेचा काळ धामधुमीचा होता. बाईबरोबर पांचपन्नास मंडळी होती. यात्रेची सर्व व्यवस्था पेशव्यांचे आत बाबुजी आणि आबाजी नाईक यांचेवर सोपवलेली होती. शिवाय महादोबा पुरंदरे आणि वासुदेव जोशी हे दोघे विश्वासु कारभारी होते. बरोबर मायेचे माणूस हवे म्हणून राधाबाईने छोट्या सदाशिवाला देण्याची गळ घातली. पण चिमाजीने आईला कष्टाने नकार दिला. मातृप्रेमाने ओथंबलेल्या पत्रांत चिमाजीने लिहिलें ' चिरंजीव सदाशिवास पाठवायचा विचार आपल्यासी बोलून आलों होतों. त्यास विचार पाहतां चिरंजीवास सवाई जयसिंगाचे घरीं बहुमान होईल हा एक अर्थ; एरवी चिरंजीवाचे यात्रेचे दिवस आहेत यैसे नाही. बहुमानाची गोष्ट म्हणावी तर तुमच्या आसीर्वादें आम्हास काय न्यून केलें आहे ? तुमची आज्ञा पाठवावे यैसीच असली तर लक्ष प्रकारें पाठवून देऊं. **तुमच्या समाधानापेक्षा आम्हांस दैवत दुसरें नाहीं.** तुम्ही देवधर्म तीर्थ करावयास जातां, त्यांत चिरंजीवाची अडचण होईल.'

या पत्राच्या शेवटीं यात्रेला निघते वेळीं राधाबाईच्या पालखीसमवेत पाय उतार होऊन घटकाभर चालत जाण्याची चिमाजीने मनीषा व्यक्त केली आहे. कांही कारणानें ती गोष्ट न घडल्यामुळे त्याने हळहळहि व्यक्त केली आहे.

राधाबाईच्या काशीयात्रेसंबंधी अनेक पत्रें उपलब्ध आहेत. तीं समग्र वाचलीं म्हणजे रजपूत राजांनी व मोंगल सत्ताधीशांनी पेशव्यांच्या थोर मातेचा आपापल्या राज्यांत कसा आदरसत्कार केला व तिच्या सुखसोयींकडे लक्ष दिलें याचें प्रत्यंतर येतें. राधाबाई काशीयात्रेला १४ फेब्रुवारी १७३५ रोजीं पुण्याहून निघाली आणि वाटेंत ब्ऱ्हाणपूर, बढ वाई, उदेपूर, नाथद्वार, जयपूर, मथुरा, वृंदावन, कुरुक्षेत्र, प्रयाग, काशी, गया इत्यादि क्षेत्रांना भेटी देऊन बुंदेलखंडमार्गें वेल्ळावरून १७३६ च्या मे अखेर पुण्याला सुखरूप परतली. १ जूनला शनिवारवाड्यांत मावंदें साजरें करण्यांत आलें. यात्रेहून सुखरूप आल्यावर सरदार दाभाड्यांच्या पत्नीने तिला पत्र पाठवून परम समाधान व्यक्त केलें आणि प्रेमळ तक्रार केली ‘परंतु आपण स्मरणपूर्वक पत्र पाठवून महायात्रेचा प्रसाद पाठविला नाही. यैसी निष्ठुरता धरिली न पाहिजे. सदैव पत्रद्वारें सांभाळ करीत गेलें पाहिजे.’

राधाबाईने नेकीने संसार केला, खूप जग पाहिलें, अनुभव घेतला. जसें ऐश्वर्य भोगलें तसे दुर्दैवाचे दशावतारहि तिला पहावे लागले. दोन्ही पराक्रमी पुत्र तिच्या डोळ्यादेखत मृत्यु पावावेत यापेक्षां दारुण दुःख तें कोणतें? त्यांच्या पश्चात् नातवाने–नानासाहेबाने तिचा चांगला प्रतिपाळ केला. १७५१ च्या श्रावणांत नानाने चांदीचे रुपये घालून तिची तुला केलीं. पण नानाचा वैभवकाळ पाहण्यास राधाबाई पुढे फार जगली नाही. जगण्यासारखं त्या वीरमातेच्या आयुष्यांत काही उरलं नव्हतं. १९ एप्रिल १७५३ रोजीं वार्धक्याने ती निधन पावली. नातवाने तिच्या उत्तरक्रियेसाठी आठदहा हजार रुपये खर्च केले.

* * *



## ३ : बाजीरावाची मस्तानी

थोरले बाजीराव पेशवे आणि मस्तानी यांची प्रेमकथा मराठ्यांच्या इतिहासांत तरी अपूर्व, अजरामर अशी आहे. छत्रपति शिवाजी महाराजांचें नातु सातारकर शाहूराजे यांचे बाजीराव हे पंतप्रधान पेशवे. थोरल्या छत्रपतींनी स्वराज्य स्थापिलें, तर थोरल्या बाजीरावाने हें स्वराज्य वर्धिष्णु करून गुजरात, माळवा, बुंदेलखंडापर्यंत मराठ्यांच्या सत्तेचा दरारा बसवला. बाजीरावाच्या नेतृत्वाखालीं मराठ्यांचे घोडे यमुनेपार गेले, दिल्लीची बादशाही हादरली, निजामाची हड्डी नरम झाली आणि पोर्तुगीज सिद्दींची रग जिरवली गेली. शिंदे, होळकर, पवार, जाधव आदि मराठे सरदार बाजीरावाच्याच तालमींत तयार झाले आणि त्यांनी मोठमोठे पराक्रम गाजवून मराठी सत्तेचा उत्कर्ष साधला. बाजीराव आणि त्याचा धाकटा भाऊ चिमाजी हे दोघेहि स्वामीनिष्ठ आणि शूर निघाले. त्यांचें

बंधुप्रेम रामलक्ष्मणासारखें आदर्श होतें. बाजीराव नेहमीं घोड्यावर म्हणजे नेहमीं मोहिमांवर असे. चिमाजीअप्पा त्याला साथ करी आणि शिवाय घरचीं कामें पाही. घरांत वडील माणूस म्हणजे आई–राधाबाई होती. पराक्रमी लेकरांवर तिची अपार माया होती. त्यांच्या पराक्रमावर, वर्तनावर तिची मायाळू पण करडी नजर असे. दोघे पुत्रहि तिच्या आज्ञेंत असत. शाहूराजे, ब्रह्मेंद्र स्वामी आणि मातोश्री राधाबाई हीं तीन त्यांचीं निष्ठास्थानं होतीं. दोघांवर छत्रपतींची कृपा होती, स्वामींचा वरदहस्त होता आणि आईचा आशीर्वाद होता. पराक्रमाला वाव होता. शौर्याला वाण नव्हती.

अप्पावर घरचं सोपवून महाप्रतापी बाजीराव घोडदौडांला निघाले. घोडदौड–अखंड अविश्रांत घोडदौड. अश्वमेधाच्या घोड्याप्रमाणे बाजीरावाच्या घोड्याला अटकांव माहीत नव्हता. मराठ्यांचे घोडे, मराठ्यांचे भाले आणि मराठ्यांच्या समशेरी ऊनपावसाची तमा न बाळगतां, भूकतहान विसरून शत्रूच्या मुलुखांतून अनिरुद्ध संचार करीत होत्या. स्वारी म्हटली कीं, बाजीरावाचे बाहु स्फुरण पावत. मोहिमेचं नांव निघालं की, राव लगोलग स्वार होत. मग जिवाची पर्वा नाही की कुटुंबाची आठवण नाही. जणु समशेरीशीच बाजीरावाचं लग्न लागलेलं. घरीं आई आहे, चिमाजीअप्पा आहे, बाळाजीनाना नी रघुनाथराव दोघे मुलगे आहेत, पत्नी काशीबाई आहे याचें मुळीं या वीरपुंगवाला भानच नसे. रणांगणावर निघाला कीं, या रणमस्ताला एकप्रकारची रणमस्ती चढायची. जिंकेन किंवा मरेन अशा ईर्षेनेंच हा मराठागडी यशाचं धन लुटून आणून छत्रपतींच्या चरणीं अर्पण करी. सदोदित मोहिमेवर असलेल्या श्रीमंत प्रतापी पंतप्रधानाची अर्धांगीं होण्याचं भाग्य लाभलं होतं काशीबाईला. खेडजवळील चासच्या जोशांची ही मुलगा. गरीब, शांत, मनमिळाऊ, सोशिक आणि पतिनिष्ठ. पति अधुनमधून घरीं आला म्हणजे काय ती गांठभेट. त्यांतून एकान्त थोडा. तेवढ्या काळांत काय पतिसेवा करतां येईल तेवढी मनापासून करीत असे आणि बाकीचा काळ त्याची वाट पाहण्यांत आणि काळजी वाहण्यांत जाई. काशीबाईस चार मुलगे झाले. त्यांपैकीं जगले दोघे. बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब आणि रघुनाथराव ऊर्फ राघोभरारी. काशीबाईच्या वाट्याला पतिसुख थोडं आलं. बाजीरावाची गत तीच होती. त्यांतून काशीबाई प्रकृतीनें

अशक्त. कदाचित् ती नाजुक असावी. बाजीरावासारख्या रणमर्द नी वीर्यशाली मर्दांची सोबत करणं सोपं नव्हतं. तिच्या आवाक्याबाहेरचं असावं. शूरमर्दास शृंगारहि हवा असतो. बाजीरावास चारचार सहासहा महिने स्त्रीसहवासावांचून काढावे लागत. दरवेळी स्वारीत काशीबाईला नेणें शक्य नसे आणि तें धोक्याचेंहि होतें.

विजयश्रीनें माळ घातली कीं, पराक्रमी पुरुषाला कोमल करपाशांची आठवण होणें साहाजिकच असतें. विजयाच्या धुंदीत शृंगाराची भूक लागते, प्रणयाची आसक्ति सुटते. वीर आणि शृंगार यांची गट्टी जमते. रणांगण गाजवून आल्यावर शीळ घालावीशीं वाटते. हें सारें सहज होतें. क्षम्य असतें. वीराला शृंगार शोभूनहि दिसतो. क्वचित् हा शृंगार वीराला बाधक ठरतो. आजुबाजूला वादळहि उठतं. प्रेमापायीं प्रतिष्ठा पणाला लागते. प्रेमी जीव पतंगज्योत न्यायाप्रमाणें प्रेम करतां करतां मरण पत्करतात. ‘ निष्प्रेम चिरंजीवन तें । जगीं दगडालाहि मिळतें । धिक् तया । क्षण एक पुरें प्रेमाचा । वर्षाव पडो मरणांचा ’ ही साऱ्याच प्रेमी जीवांची विलापिका आहे. महाप्रतापी बाजीरावावर हीच विलापिका गाण्याचा प्रसंग ओढवला ! नियतीनें त्याच्या पराक्रमावर भाळून, त्याला विरंगुळा मिळावा म्हणून लावण्यवती मस्तानी निर्माण केली आणि बुंदेलखंडांत उभयतांची गांठ घालून दिली. मराठ्यांच्या इतिहासांत बाजीराव-मस्तानीसारखी उत्कट, अद्‌भुतरम्य नी शोककारक प्रेमकथा घडली नाही. शृंगारवीर—करुणरसानें रंगलेली ही कथा सदैव ताजी राहणारी आहे.

मस्तानी ही कुठली, कोणाची आणि ती बाजीरावाच्या सान्निध्यांत केव्हां आली यासंबंधी इतिहासांत मुख्यत: तीन समजुती प्रचलित आहेत. पहिली लोकप्रिय रूढ समजूत म्हणजे, बुंदेलखंडाचा वृद्ध राजा छत्रसाल याच्या मुसलमान रक्षेची ती मुलगी होय. दुसरी समजूत अशी कीं पालखेडच्या लढाईंत पराभव झाल्यानंतर निजामाने प्रेमाची भेट म्हणून ती बाजीरावाला नजर केली. तिसरी समजूत याहून नाट्यपूर्ण व बहारीची आहे. बाजीराव बुंदेलखंडांत स्वारीवर असतां निजामावर शहाजतखान नांवाचा सरदार चालून गेला. यावेळीं शाहूराजांच्या आज्ञेनें चिमाजीअप्पा खानाला रोखण्यासाठी निघाला. चिमाजीनें खानाच्या फौजेवर अचानक

हल्ला करून ती फौज उधळून लावली. या धामधुमीत खानाची दरबारी कलावंतीण मस्तानी विषप्राशन करून जीव देण्याच्या प्रयत्नांत असतां चिमाजीच्या दृष्टीस पडली. 'विडा खाऊन पीक गिळली तर ती गळ्यांतून दिसावी' अशी नाजूक नी गोरीपान होती मस्तानी. शीलवंताला मोह पडावा, नीतिवानाचें मन विचलीत व्हावें, चारित्र्यसंपन्नाची नजर खिळून रहावी अशी ही सुंदरी होती. मस्तानीच्या रूपानें मूर्तिमंत लावण्यच भूलोकीं अवतरलें असा चिमाजीस भास झाला. आत्महत्येपासून चिमाजीनें तिला अर्थातच परावृत्त केलें आणि अभय देऊन वडील भावाकरिता तिचा स्वीकार केला. याप्रसंगीं मस्तानीने अशी अट घातली म्हणतात की, 'बाजीरावापासून मला जो बेटा होईल त्याला राज्याचा अर्धा वाटा मिळाला पाहिजे.' चिमाजीने ही अट पुरी केली आणि तिचा स्वीकार करून पुढें बाजीरावास नजर केली. मस्तानीच्या कुळकथेवर प्रकाश टाकणारें पेशवे दप्तरांत आणखी एक पत्र उपलब्ध आहे. पत्र मोडींत बाजीरावाला लिहिलेलें पण सही व दिनांक नसलेलें आहे. त्यांतील मस्तानीविषयक मजकूर असा––'साहेबांपासी मस्तान आहे त्यावरून आम्हांसहि समाधान आहे. यामध्यें कांहीं अनमान असेल तरी साहेबाचे पायाची आण आहे. आमचा कांहीं परामर्श न केला. साहेब थोर आहेत. आम्ही विनंती लेहावी यैसा कांहीं अर्थ नाही. परंतु लौकीक बहुतसा जाला आहे कीं, आम्हांपासून पोरी हिरोन घेतली यैसा विचार झाला आहे यैसे न कीजे. दोनी महिने पाठवून दीजे. मागती सवेच पाठऊन देऊन'. या पत्रातील आशयावरून पत्रलेखक मुली पुरवणारा एखादा धंदेवाईक दलाल असावा असें दिसतें.

मस्तानीसंबंधीच्या वरील तीनचार कुळकथांचा विचार करतां पहिली कुळकथाच अधिक विश्वसनीय आणि तर्काला धरून वाटते. इतिहासकारांनीं आणि संशोधकांनी छत्रसालाच्या मस्तानीचाच अधिक पाठपुरावा केलेला आढळतो. छत्रसाल हा बुंदेलखंडाचा शूर, मुत्सद्दी, न्यायी, उदार आणि रसिक वृद्ध राजा होता. अलाहाबादचा मोंगल सुभेदार महंमद बंकश याचा त्याच्या राज्यावर डोळा होता. १७२७ पासून बंकश बुंदेलखंडाला उपसर्ग देऊं लागला. छत्रसालाने बाजीरावाकडे मदतीची याचना केली. पण बाजी निजामाशी मुकाबला करण्यांत गुंतला असल्याने त्याला छत्रसालाकडे जातां

येईना. दरम्यान बंकशने छत्रसालावर विजय मिळविला आणि त्याला कैदेंत टाकलें. राजाने तेथून पुन्हा बाजीरावास मदतीचें आवाहन केलें. सुदैवाने बाजीराव यावेळी निजामाच्या पराभव करून मोकळा झाला होता. छत्रसालाच्या आर्त हांकेला त्याने तत्काळ ओ दिली. बाजीराव वेगाने बुंदेलखंडांत चालून आला आणि बंकशच्या मगरमिठींतून त्याने छत्रसालाची मुक्तता केली. मराठा पेशवा आणि बुंदेला राजा यांची भेट झाली. मैत्री जडली. इ. स. १७२९ च्या वसंतऋतूंतील—ऐन वैशाखमासीचे दिवस होते. घोडदौड विसावली होती. समशेरी म्यान झाल्या होत्या. रणधुमाळीची मस्ती ओसरली होती आणि शृंगाराची धुंदी चढत होती. छत्रसालाने थाटाचा दरबार भरवला आणि विजयी बाजीरावाचें स्वागत केलें. राज्याचे तीन हिस्से करून दोन स्वतःच्या दोघा मुलांना दिले आणि तिसरा बाजीरावास अर्पण केला. पण स्वागत एवढ्यानेच संपलें नाही. हारतुरे झाल्यावर चांदींचें तबक घेऊन एक रूपसंपन्न गोरीपान नवयौवना नृत्याच्या लयींत दरबारांत प्रवेश करती झाली. सर्वांच्या नजरा तिजवर रोखल्या गेल्या. बाजीराया तर त्या नाजूक लावण्यवतीला पाहून कमालीचा मोहित झाला, नव्हे कामपीडित झाला. तिचं नांव मस्तानी होतं. राजा छत्रसालाची ती मुलगी होती. मस्तानी दरबारांत आली आणि तिने आपल्या पित्यापुढे विड्याचे तबक केले. पित्यानें तिच्या रसरशीत मुखकमलावरील ओढणी दूर केली आणि तिला म्हटलं, 'आधी बाजीरावाला, मग मला. आजपासून तुला मी बाजीरावाच्या स्वाधीन करीत आहे. वीर आणि शृंगार यांची आजपासून पवित्र युती होऊं दे. बेटा, रावाचा हात धरून पुण्यनगरास जा. तेंच तुझें घर आणि हा रणमर्दच तुझा सखा–पोशिंदा. त्याची सोबत कर. त्याची प्रेरणा हो. त्याला सुखव. त्याचा पराक्रम फुलव.'

मस्तानी बाजीरायासंगे पुण्यास निघाली. रक्षेची कां होईना, पण ती छत्रसालाची पुत्री होती. रूपसंपन्न होती, गुणी होती, नर्तकी होती, मंजुळ गात होती आणि दरबारास रिझवीत होती. तिच्या जाण्याने छत्रसालास कण्वाप्रमाणें दुःख झालें. बाजीराव पुण्यास आले. गणेशोत्सव आला. वाड्यांतील गणेशमहालांत मस्तान कलावंतानें प्रथमच हजेरी दिली. आपल्या नृत्यगायनानें आणि रूपयौवनानें तिनें साऱ्या दरबाराकडून वाहवा मिळवली.

शनिवारवाड्यांत बाजीरावानें तिच्यासाठीं खास महाल बांधला. वाड्यांतून उभयता बाहेर पडत त्या दरवाजास प्रजाजन मस्तानी दरवाजा म्हणूं लागले. पतिदेवाच्या या कृतींमुळें काशीबाईने मूकविलाप केला. तिच्या सुखांत, वैभवांत वाटेकरीण उत्पन्न झाली होती. पण बाजीरावास ती कधी बोलली नाहीं, रागावली नाहीं. पतिसेवेच्या व्रतांत तिनें अंतर पडूं दिलं नाही. मस्तानीच्या आगमनाने मातोश्री राधाबाई आणि चिमाजीअप्पा मात्र रागावले, कष्टी झाले. पण पंतप्रधानाची कानउघाडणी कोण करणार ? दरबारी मुत्सद्दी आपापसांत कुजबुजूं लागले. मस्तानीची कीर्ति साताऱ्यास महाराजापर्यंत पोचली. पण सारे जागच्याजागीं गप्प. महाप्रतापी पंतप्रधानाचें कृत्य ! त्याचा जाब कोण विचारणार ? कुणाची छाती व्हावी ? होऊं नये तें झालें. करूं नये तें केलें. दुर्लक्ष करणें हाच सुज्ञपणाचा मार्ग असा विचार करून सारेजण मूग गिळून बसले.

मस्तानी बाजीरायाची प्रिया झाली. प्रेरणा बनली. नृत्यगायनानें ती त्याला रिझवूं लागली. जननिंदेची पर्वा न करतां हे प्रेमी जीव एकमेकांच्या सुखदुःखांशीं समरसूं लागले. विवाहित पत्नीइतक्या प्रेमानें आणि निष्ठेनें मस्तानी बाजीरावाला सेवा–सुख देऊं लागलीं. १७३० च्या फाल्गुनांत रायाच्या वडील पुत्राचे–नानासाहेबांचें लग्न निघालें. याप्रसंगीं 'मस्तान कलावंतास लग्नसंबंधे खर्च देहनगी रुपये शंभर व वस्त्रे' मानाने दिलीं गेली. दोन वर्षांनी मस्तानीस पुत्र झाला. त्याचे नांव समशेरबहाद्दर ठेवण्यांत आले. आपल्या इतर पुत्राप्रमाणेच समशेरास घरांत वागणूक मिळावी व त्याच्यावर संस्कार व्हावेत अशी बाजीरावाची आंतरिक स्वाभाविक इच्छा होती. पण रूढीविधिनीतीच्या जुन्या जमान्यांत ही इच्छा पुरी होऊं शकली नाही. समशेर ब्राह्मणी आणि मुसलमानी संस्कारांत लहानाचा मोठा होऊं लागला. मोह आणि कर्तव्य अशा चक्रांत बाजीराव पुरा सांपडला. कधी मोह कर्तव्यावर मात करी, तर कधीं कर्तव्य मोहावर विजय मिळवीं. विजयश्री-बरोबरच रूपश्रीहि शाहूराजांना दाखवावी अशा जिद्दीनें बाजीराव एकदा मस्तानीला घेऊन साताऱ्यास गेले. पण पंतप्रधानांचें हें वर्तन छत्रपतींना रुचले नाहीं. साताऱ्यात पंतप्रधानांचे स्नेही सावकार होते. त्यांनीसुद्धा नाराजी व्यक्त केली. १७३७ च्या मार्चमध्यें बाजीरावानें दिल्लीला धडक

दिली. त्यावेळी मस्तानी संगें होतीच. घोड्यावर स्वार झालेलें हें प्रेमी युगल मोंगल फौजेच्या दृष्टीस पडलें होतें. बाजीरावाच्या संगतीनें मस्तानी धीट, धीराची व अश्वरोहणांत कुशल होत गेली. प्रसंगीं तलवारहि चालवून दाखवण्याची तिची तयारी असे. 'तारीख इ मुहमदशाही' या ग्रंथांत मस्तानीचा गौरव पुढील शब्दांत आढळतो. 'मस्तानी कलावंतीण अश्वारोहणांत, तलवारबाजींत व भालाफेकींत कुशल आहे. ती नेहमी बाजीरावाबरोबर स्वारींत असते. घोडदौडींत दोघांचे घोडे बरोबर असतात.' मस्तानीच्या नांवावर कांहीं मराठी कविता उपलब्ध असल्याची माहिती कै. निफाडकर कवींनी पूर्वी उजेडांत आणली होती.

बाजीराव आणि मस्तानी यांच्या प्रेमी जीवनाचा शेवट अतिशय नाट्यपूर्ण आणि शोककारी झाला. त्यांची प्रेमकथा एकप्रकारें शोकान्तिकाच म्हणावी लागेल. प्रेम कीं कर्तव्य या झगड्यांत सांपडलेला बाजीराव आयुष्याच्या अखेरीस प्रेमपाशांतच अधिक गुरफटला. प्रेमापायीं त्याने प्रतिष्ठा पणाला लावली. प्रेमाच्या धुंदींत तोल सुटून तो कांहीसा कर्तव्यच्युत झाला. स्वछंदी बनला. तशांत त्याची पत्नी आजारी पडूं लागली. १७३९ व ४० हीं दोन वर्षे मस्तानीचें प्रकरण चिघळत गेलें. बाजीराव यावेळीं चाळीस वर्षांचा होता. त्याचा उत्साह कायम होता. घोडदौडीला खंड नव्हता. तथापि या काळांत मस्तानीच्या सहवासाचा मोह त्याला अनिवार होत गेला. मस्तानीच्या संगतींत तो मद्यप्राशन आणि अभक्ष भक्षण करूं लागला. विवेक सुटला. विकार प्रबळ झाले. विचार निमाले. भावना भडकत गेल्या, आणि मग मात्र मातुःश्री राधाबाई, बंधु चिमाजी आणि वयांत आलेला पुत्र नानासाहेब यांना काळजी पडली. तिघांनीं हिय्या करून मनावर घेतलें आणि बाजीरावाला मस्तानीपासून दूर ठेवण्याची त्यांनीं खटपट आरंभिली. दुखणें नाजुक होतें. पण तें कठोरपणें, युक्तिप्रयुक्तीने निवारण करणें आवश्यक होतें. १७४० च्या एका पत्रांत राधाबाई चिमाजीस लिहिते कीं, 'चिरंजीव राजश्री राव याजपाशीं बहुत युक्तीच्या विचारें जो विचार करणें तो करून येणें, चालीवरी नजर देऊन जें कर्तव्य तें करावें.' चिमाजी आपल्यापरी बाजीरावास कळकळीने चार गोष्टी सांगत असे. करारी आई आणि रणशूर, चारित्र्यवान् पण प्रेमळ बंधु चिमाजीअप्पा यांच्या विषयी बाजीरावाला आदर होता. दोघांविषयी


एकप्रकारें आदरयुक्त भीतिसुद्धा त्याला वाटत असे. अप्पाच्या सांगण्याचा अधूनमधून उपयोग होईसुद्धा. अप्पा एका पत्रांत आईला लिहितो, ‘ रायासी च्यार गोष्टी नर्मतेने बोललों. सांप्रत पहिल्यापेक्षां बोलून चालून भोजन करून सुखरूप आहेत. देवाची दया आहे. तर दिवसेंदिवस संतोषीच होत जातील. चित्तांत मात्र वेध आहे तो कललाच आहे. ’ यावरून रायाच्या वर्तनाची त्याला खात्री नसे हें स्पष्ट दिसतें. १७३९ च्या फेब्रुवारीत पुण्याला राघोबाची मुंज आणि सदाशिवभाऊचें लग्न निघालें. यावेळीं बाजीराव मस्तानीच्या संगतींत स्वारीवर होता. दोन्हीं कार्यें अप्पास करावीं लागलीं. उभय कार्यांस छत्रपति उपस्थित झाले, पण राव फिरकले नाहीत. वडील बंधूला ताळ्यावर कसें आणावें याची आप्पास विवंचना पडली. मस्तानीची संगत सुटल्याशिवाय बंधु सुधारत नाही असें त्याला वाटूं लागलें. ‘ पाटलाकडून कोंबड्याचें प्रयोजन ’ घेणाऱ्या आपल्या भावास मस्तानीने बिघडवलें असे परखड विचार पुतण्याला लिहिलेल्या एका पत्रांत त्यानें व्यक्त केले.

मस्तानीच्या संगतीने बाजीरावाचा आणि राज्याचा नाश ओढवेल अशी खात्री पटतांच अप्पाने आणि त्याच्या आज्ञेंत वागणाऱ्या नानासाहेबाने कठोर निर्णय घेतला. कटु कर्तव्याला ते तयार झाले. मद्यमांस घेणाऱ्या बाजीरावावर सारा ब्रह्मवृंद रुष्ट झाल्यामुळे रावाला प्रायश्चित्त घ्यायला लावायचें आणि मस्तानी पुण्यांत आल्यावर तिला अटकेंत ठेवायची असे दोन बेत उभायतांनी ठरविले. हे बेत अर्थातच बाजीराव – मस्तानीच्या कानीं गेले. मग उभयता सचिंत झाले. आप्पाची दोघांना भीति वाटूं लागली. मस्तानीस अन्न गोड लागेना. तिची भीति अखेर खरी ठरली. मीलनाचा वसंत संपून वियोगाचा, चिरवियोगाचा काळ प्राप्त झाला. भावाच्या आणि राज्याच्या हिताकरिता आप्पाने अखेर मस्तानीस कैद करून पुण्यांत ठेविले नि तिने पळून जाऊं नये म्हणून चौकी-पहारे बसविले. प्रेम आणि प्रतिष्ठा अखेर पणाला लागली. सहवाससुखास अंतरल्यामुळे बाजीराव–मस्तानी कष्टी झाले. प्रायश्चित्ताची गोष्ट काढतांच राव म्हणाले, ‘ मस्तानी आणून देणें म्हणजे महिन्यादोंचौमध्ये आपण प्राशनाचें ’ सोडतों. मद्यमांस सोडतो, पण मस्तानीशीं ताटातूट करूं नका अशी रावाला विनवणी करावी लागली. कैदेंत मस्तानीने खूप वैताग केला. ती मनस्वी कष्टी झाली. रावाकडे पळून जाण्याच्या खटपटीस लागली. तिकडे बाजीराव

आग्याने करकुंभास व तेथून पाटसला निघून गेला. राज्य नको, मस्तानी हवी इतका तो अगतिक व मोहवश झाला. मस्तानीच्या मीलनाशिवाय तो घोड्यावर स्वार होईना की तलवारीला हात घालीना. शेवटीं प्रकरण शाहु-राजाकडे गेलें. त्यांनी व्यापक व दूरदृष्टि ठेवून विवेकाचा सल्ला दिला कीं, ' तापलेली काच निवूं द्या. '

मस्तानीचा वियोग, गृहकलह आणि अप्रतिष्ठा ही सारी न सोसवून बाजीराव भडकला आणि उत्तरेकडे नासिरजंगाच्या स्वारीवर निघाला. नासिर-जंगाशीं तह झाल्यावर ( २७–२–१७४० ) स्वारीचा मुक्काम एप्रिलमध्ये नर्मदाकाठीं रावेरखेडी येथे पडला. मस्तानीची हालहवाल कळण्यासाठी तो उत्सुक होता. पण ती कळूं शकली नाही. लढाईच्या दगदगीमुळे याच मुक्कामांत बाजीराव आजारी पडला. वैद्य हकीमांनी उपाय केले. ब्राह्मणांकरवीं उदक, कुंभदान, मृत्युंजयजप इत्यादि सोपस्कार झाले. पण गुण येईना. ताप हटेना. मस्तानीची आठवण येत होती. पण ती दूर होती. भेटणं अशक्य होतं. अखेर २८ एप्रिल १७४० रोजीं हा प्रेमी महाप्रतापी पेशवा प्रियेच्या आठवणी काढीत निधन पावला. मस्तानी पुण्यांत होती. तिच्या कानीं रायाच्या आजाराची अशुभवार्ता जातांच ती घोड्यावर स्वार झाली आणि त्वरेने निघाली. पाबळला मुक्काम पडला. रायाने पाबळ केंदूर गावें तिला इनाम दिलीं होतीं. पाबळहून कूच करणार तोंच रायाच्या निधनाची वार्ता तिला समजली. प्राणसखा गेल्यावर तिचं जीवनच संपल्यासारखं झालं. सख्याचा वियोग तिला सोसवला नाही. आजारी पडून ती पाबळला गतप्राण झाली. कुणी म्हणतात ती पुण्याला वारली. तें कसंहि असलं तरी पाबळला तिचें दफन झालें. तिथे तिची कबर बांधण्यांत आली. समशेर बहाद्दराच्या रूपाने बाजीरावाचा पराक्रमी वारस ठेवून मस्तानीने प्रेमासाठी हसत हसत मरण पत्करलें !

★ ★ ★



# ४ : सती रमाबाई

थोरले माधवराव पेशवे आणि त्यांची पत्नी रमाबाई यांची संसारकथा अतिशय शोकपूर्ण, जिवाला चटका लावणारी, पण उदात्त–अद्‌भुत अशी आहे. खरं म्हणजे या उभयतांनी संसार असा केलाच नाही. माधवराव हा कांहीं संसारी पुरुष नव्हता, तो होता राजकारणी आणि हें राजकारणसुद्धा तो कर्तव्यभावनेने करीत होता.

पानिपतच्या भीषण संग्रामांत मराठ्यांची लाख बांगडी फुटली आणि महाराष्ट्रावर अस्मानी संकट गुदरलें. या संग्रामांत माधवरावाचा थोरला भाऊ विश्वासराव आणि चुलता सदाशिवरावभाऊ दोघेहि प्राणास मुकले. पुत्रशोक आणि बंधुशोक यांमुळे माधवरावाच्या वडिलांनी–नानासाहेबांनी–पर्वतीवर अंथरूण धरलें. क्षयाने त्यांचें शरीर आधीच पोखरलें जात होतें. पानिपतच्या धक्क्याने त्या दुर्बल शरीराला असा जबरदस्त धक्का बसला कीं, पेशवाईचा हा धनी ‘ भाऊ-भाऊ ’ असा शोक करीत पर्वतीवर निधन पावला. माधवराव यावेळीं सोळा वर्षांचा होता. त्याला नुकतेंच कुठें मिसरूड फुटत होतें. लग्न झालें होतें, पण बायकोची तोंडओळखदेखील नव्हती. नानासाहेबांच्या निधनानंतर कारभारी सातारला गेले आणि त्यांनी माधव-

रावासाठीं पेशवाईचीं वस्त्रें मिळविलीं. सोळाव्या वर्षीं राज्यकारभाराची धुरा पेलणारा हा पुरुष मराठ्यांच्या इतिहासांत तरी असामान्य होता. शिवाजी आणि थोरला बाजीराव यांच्यानंतर माधवरावाइतका थोर राजकारणी पुरुष इतिहासाला ठाऊक नाही.

महाराष्ट्राच्या दुर्दैवाने या थोर पेशव्यास आयुष्य फार लाभलें नाही. सोळाव्या वर्षीं या पुरुषोत्तमानें राज्यसूत्रें हातीं घेतलीं आणि अवघ्या सत्ताविसाव्या वर्षीं त्याला काळाने ओढून नेलें. जेमतेम अकरा वर्षें माधवरावाला कारभार करतां आला. पण या अकरा वर्षांत अत्यंत धैर्यानें व सूज्ञपणें वागून त्याने कारभाराची विस्कटलेली घडी नीट बसविली व चारी बाजूंच्या शत्रूंना मराठ्यांचा दरारा बसवला. हीं सारीं वर्षें राज्यासाठी अविश्रांत खपण्यांतच त्याने काढली. नऊदहा लहानमोठ्या मोहिमा लढविण्यांत आणि राघोबादादाने मांडलेला गृहकलह मिटविण्यांत माधवरावाला कमालीची शारीरिक आणि मानसिक दगदग सोसावी लागली. इतकी की, शेवटी कर्नाटकांतील हैदराच्या स्वारीनंतर तो आजारीच पडला. अतिश्रमाने त्याचे उंच थोराड शरीर सुकत चाललें. तेजस्वी चेहरा म्लान होऊं लागला. पाणीदार डोळेच काय ते सर्वांना भिववीत होतें. राज्य प्रजेचें आहे; आणि प्रजेच्या हिताकरतां छत्रपतींनी आपणांवर तें चालविण्याची कामगिरी टाकली आहे ही कर्तव्याची जाणीव माधवरावाजवळ सतत होती. त्यामुळें तो अहर्निश राज्याचीच चिंता वाहत असें. स्वयंप्रज्ञता, कर्तव्यनिष्ठा, सुज्ञपणा, न्यायनिष्ठुरपणा, धीरता-वीरता इत्यादि गुणांबरोबरच माधवरावाजवळ आणखी दोन गुण होते. आणि ते म्हणजे शील आणि धर्माचरण.

नाना औषधोपचार केले, अनुष्ठानें केलीं, हवापालट केला, तरी गुण येईना, म्हणून माधवराव अखेर थेऊरला आला. राजयक्ष्म्यानें राजबिंड्याचा कबजा घेतला होता. मोहिमा थंडावल्या होत्या. क्षयानें या नरपुंगवाच्या अफाट कर्तृत्वास अटकाव केला होता. राजकारण अपुरें राहिलें होतें. आणि संसार? तों डावहि अपुराच राहिला होता. थेऊरच्या वाड्यांत धन्याच्या सेवाशुश्रूषेस कारभारी आले होते, वैद्य आले होते, कारकून होते, हुजरे होते—सर्वजण त्या अनमोल जीवाला जपत होते. धन्याच्या प्रकृतीस आराम पडावा म्हणून दानधर्मादि कृत्येंहि सुरू होतीं. पण आता माधव-

रावाची महायात्राच संपत आली होती. इच्छा दोनच होत्या. पहिली : मरण देवासन्निध, गजाननासमोर यावें आणि दुसरी : पत्नीची ताटातूट होऊं नये— तिने सह यावें, स्वर्गास सहगमन करावें.

बिचारी रमा. अबोल पण अतिशय धार्मिक वृत्तीची व पतिनिष्ठ. लग्नांत सारी चारपांच वर्षांची होती. आठ वर्षांच्या माधवरावाशीं तिचा योगायोगानें आणि अकल्पितपणें विवाह झाला. नानासाहेबाने नरहर अप्पाजीच्या मुलीशीं माधवरावाचें लग्न ठरविलें होतें आणि स्वहस्तें पत्रिकाहि रवाना केल्या होत्या. पण अकस्मात् काय घोटाळा उत्पन्न झाला कुणास ठाऊक, हें लग्न फिसकटलें आणि याच मुहूर्तावर शिवाजी बल्लाळ जोश्यांच्या गुणशीलवान् मुलीशीं माधवरावाचें, मार्गशीर्ष शु. १४ शके १६७५ दि. ९-१२-१७५३ रोजीं पुण्याला लग्न झालें. ही शीलवती म्हणजेच रमाबाई. लग्न झालें खरें, पण संसार सुरू झाला नव्हता आणि संसारसुखाचा तर पत्ता नव्हता. १७६५ सालीं पंधराव्या वर्षी रमाबाईचा गर्भाधानविधि झाल्याचा उल्लेख मिळतो. म्हणजे या दांपत्यास वैवाहिक जीवन लाभलें तें उणेंपुरें ७ वर्षें. या सात वर्षांपैकी अखेरचें वर्ष—दीडवर्ष पतीच्या असाध्य आजारापायींच खर्ची पडलें.

माधवरावाचें मन अहर्निश राजकारणांत गुंतलेलें. संसारांत तें फारसें रमलेंच नाहीं. कधीं कधीं मोहिमांवर निघतांना माधवराव रमाबाईस बरोबर नेई. इ. स. १७७० मधील कर्नाटकच्या स्वारींत रमाबाई व धाकटा भाऊ नारायणराव माधवरावाबरोबर होते. यानंतरचा माधवरावाचा काळ हवापालट करण्यांत व औषधोपचारांतच गेला. रमाबाई या काळांत पुण्याला असे. अधूनमधून ती वाईला किंवा गंगापूरला सासूबाईकडे जात असे. १७६७ मध्यें वडील वारले, त्यावेळीं आईच्या भेटीसाठीं ती नाशकास गेली होती. पतीच्या अखेरच्या आजारांत ती हरेश्वराच्या यात्रेस गेली होती. पतीला आरोग्य लाभावें हाच अर्थात् या यात्रेचा हेतु होता. पण तो सिद्धीस जायचा नव्हता. रमाबाईचें सांसारिक जीवन मूक-दुःखानें व्यापलेलें होतें. पतिसुख न लाभूनहि ती पतिनिष्ठ होती. तिला मूलबाळ झालें नाहीं, पण धाकट्या दिरावर तिचें अपत्यवत् प्रेम होतें.

थोर पुरुषाची पत्नी झाली तरी रमाबाई स्त्री होती. तिला भावना होत्या,

वासना होत्या. कधीमधी त्या व्यक्त होत, पण जागच्या जागींच जिरून जात. मोरोबा पटवर्धनांकडे दोन चांगले हत्ती होते. रमाबाईस त्यांतला एक आवडला. तिनें कारकून जिवाजी परशुरामास पटवर्धनांकडे पाठविलें. पण तिला हत्ती मिळाला नाहीं. कर्दनकाळ माधवरावांची ती पत्नी होती. पण तिची ही इच्छा पुरी होऊं शकली नाहीं. रमाबाईला एकदा विडा खाण्याची इच्छा उत्पन्न झाली. तिनें नाना फडणिसाकडे ' चांगली पानें पाठवून द्या ' असा निरोप पाठवला. पण जबाब आला, ' पति सन्निध नसतां बायकांनी विडा सेवन करूं नये. ' आणि मग रमाबाईचे ओठ कधींच रंगले नाहींत. ओठ रंगवायचे ते ज्वालेचें चुंबन घेऊन, असेंच जणु तिच्या ललाटीं लिहिलें होतें.

रमाबाई पुण्यांत, तर माधवराव थेउरांत होते. दिवसेंदिवस दुखणें विकोपाला चाललें. ताप हटेना, वेदना थांबेनात. जीव घाबरा होऊं लागला मूळचा तापट स्वभाव चिडचिडा बनला. औषध घेईनासे झाले. पथ्यपाणी पाळीनात. जिवाची आशा सोडली. जीव नकोसा होऊन खंजीर मागत. तो दिला नाहीं म्हणजे शिवीगाळ करीत. आज्ञा मोडली म्हणून इच्छारामपंतास फटके मारवले. पण सारेजण धन्यासाठीं आनंदाने सर्व कांहीं सोसत होते. गंगापुरास मातोश्री गोपिकाबाई होती. ती वारंवार पत्र पाठवून पुत्राच्या प्रकृतीची चौकशी करी, सूचना देई. काशीयात्रेस निघाली होती. पण राघोबाने न जाण्याचा सल्ला दिला. कार्तिक वद्यांत आजार वाढल्यानें वाड्यांतून देवळांत येऊन राहिले. आराम पडावा म्हणून गणपतीस संतत धार धरिली होती. देवास दहा हजारांचा मोत्याचा तुरा दिला व श्री वेंकटेशास दहा लक्षांचा नवस केला. पण दयार्णवास दया येईना. राघोबादादास पुढची व्यवस्था सांगून राव प्रस्थानास लागले.

प्रिय पत्नीस—रमाबाईस—बोलावणें धाडलें. एकान्तांत डोळे भरून पाहून घेतलें. त्या साध्वीसहि ' सेवेला अंतरणार ' म्हणून रडूं कोसळलें. मग जड अंतःकरणानें रमेस सहगमनाविषयी बोध केला. त्या साध्वीने तत्काळ जबाब दिला—' जी आपली इच्छा, ती माझी. ज्यांत आपल्याला सुख, त्यांत मला. ईश्वरसत्ता प्रमाण. ' हा झाला अखेरचा एकान्त. यानंतर रमाबाईनें अन्न वर्ज्य केलें. फक्त दूध व गोमूत्रावर ती राहूं लागली. देह कष्टवून देवापाशीं तिनें धरणें धरलें. ' जिथे ते तिथे मी. चरणसेवा कधीं न सुटावी. '

कार्तिक वद्य तृतीयेस माधवरावाची प्रकृति चिंताजनक झाली. हातपाय सुजले होते. दर्शनास लोकांची रीघ लागली होती. रमाबाईनें सती जाण्याचा निश्चय केला होता. तिला कोणीहि परावृत्त करूं शकले नाही. सांडणीस्वार पाठवून पुण्याहून सतीची वस्त्रें आणवलीं गेलीं. कार्तिकाची वद्य अष्टमी उगवली. दि. १८-११-१७७२. माधवरावास अखेरची घरघर लागली होती. डोळे उघडे होते. भेटीला येणाऱ्यास हात जोडून नमस्कार करीत होते. ज्यांना द्यायचं होतं त्यांना देऊन झालं होतं. जेवढं देतां येईल तेवढं देऊन झालं होतं. सकाळीं ९ वाजण्याचा सुमार. 'आतां महायात्रेला जातों' असं बोलून नेत्राद्वारें माधवरावाने प्राण सोडला, छत्र उडालें. सारे प्रजाजन पोरक्या पोराप्रमाणें रडूं लागले. मग प्राप्त कर्तव्यास लागले.

दुपारीं नदीच्या कांठीं चंदनाची चिता रचली गेली. 'रमावहिनींनी तरुणपणांत स्त्री-धर्माची शर्थ केली. सर्व जवाहीर आपल्या हातानें वाटलें. धर्मशीलेवर उभे राहून दादासाहेबास बोलावून धाकटे श्रीमंतास त्यांचे हातीं दिलें. सर्वांचें वडीलपणें यथास्थित चालवावें असें सांगोन सती गेली. जसा श्रीमंताचा प्रताप होता, तसा बाईनी शेवट केला. त्यांच्या पुण्यास जोडा नाही. सूर्यमंडळ भेदून गेली.'

थेऊरास नदीचे कांठीं घाटावर एक वृंदावन आहे. रमा—माधवाच्या त्या स्मारकास सहस्र प्रणाम—अनंत प्रणाम.

* * *

दा. क्र. 9200
५८।५९
विषय



# ५ : पुण्यश्लोक अहल्याबाई

इ. स. १७५४ चा मार्च महिना. सुरजमल जाटाचें आव्हान स्वीकारून राघोभरारीने युद्ध पुकारलें होतें. कुंभेरीच्या किल्ल्यास मराठ्यांचा वेढा पडला. चार महिने झाले तरी जाट दाद देईना. सुभेदार मल्हारराव होळकराने हात टेकले. आपला एकुलता एक पुत्र खंडेराव आणि लाडकी सून अहल्या यांना घेऊन तो रणक्षेत्रांत उतरला होता. पुत्रापेक्षा सुनेवरच सासऱ्याची माया होती. मल्हाररावाची ही सून जात्या मोठी दयाळू, परोपकारी, धार्मिक आणि धीराची बाई होती. रणशूर स्वामीभक्त सासरा आणि धार्मिक करारी सासू ( गौतमाबाई ) यांच्या सहवासांत अहल्याबाईस अनेक लढाया जवळून पाहतां आल्या. तिला अनेकदा कारभारांतहि भाग घ्यावा लागे. तिचा पति खंडेराव शूर खरा, पण आईबापांच्या लाडाने जरा स्वच्छंदी बनला होता. युद्धाच्या धामधुमींत देखील हा पठ्या भांग पिई. या भांगेपायींच अहल्ये-सारख्या तुळशीचें जीवन करपून गेलें.

दि. १७ मार्चला भोजन करून बेहोष अवस्थेंत ' मोर्चियांत निशाणापाशीं आला. तो एकाएकीं प्रळयवीज पडते तैसे होऊन जेजालेची गोळी अकस्मात् लागून मोर्च्यांत ठार झाला. हें वर्तमान मल्हारराव यांस कळतांच तो घाबरा झाला. कारण त्यास पुत्र काय तो तेवढाच. त्याची गति अशी जाली हें जाणोन मल्हारराव यांस असें झालें कीं, पर्वत मस्तकीं कोसळतो किंवा अंगावर विद्युल्लता पडते ! ' एकुलत्या एक अशा पुत्राच्या शोकानें तंबूतून तो उघडा बोडका सारखा पळत सुटला. पुत्रशोकानें म्हातारा वेडा झाला. त्याला विलक्षण त्वेष चढला. सूडाने मन पेटलें. जाटाचा थरकाप उडावा अशी या वृद्ध मल्हारीने प्रतिज्ञा केली, ' सुरजमल्लाचा शिरच्छेद करून कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन तरच जन्मास आल्याचें सार्थक, नाही तर प्राणत्याग करीन. ' प्रतिज्ञा केली खरी, पण प्राप्त कर्तव्य समोर उभें होतें.

खंडेरायाच्या मृत्यूने त्याच्या साध्वी पतिव्रता पत्नीला—अहल्येला—किती बरें शोक व्हावा ? तिच्या दुःखाला सीमा नव्हती. खंडेराव कसाहि असला तरी तिचा पति होता. तिच्या सौभाग्याचा ठेवा होता. ताईत होता, तुरा होता. हिरा होता. तो अकस्मात् निखळून पडल्यावर अहल्येला जगण्यांत राम वाटेना. तिने सती जाण्याचा, पतीबरोबर सहगमन करण्याचा निर्धार केला. वृद्ध मायाळू सासू—सासऱ्यांना आणि दोन गोजिरवाण्या मुला—मुलींना सोडून अहल्या सती जावयास निघाली. तिचा हा बेत पाहून मल्हाररावासारखा पोलादी पुरुष आणखीच दुःखी-कष्टी झाला. पुत्राइतकीच सुनेवर त्याची माया होती. पुत्रामागें तीच या म्हाताऱ्याची काठी होती. सावली होती. दौलतीची धनीण होती. राज्याची मालकीण होती. प्रजेचें छत्र होती. सोन्यासारखी सून सती जाते असें पाहून गुडघ्यांत तोंड घालून बसलेला म्हातारा ताडकन् उठला आणि रडव्या स्वरांत त्याने विनवणी केली—' बाई, मला उन्हाळा करित्येस की काय ? तूं माझे पाठीवर आहेस तर अहल्या मेली व खंडू आहे हा मला भरंवसा. माझी सारी दौलत, राज्य संभाळावयाचें तें काम तूंच माझा खंडू आहेस असें समजून मी तुझ्याकडून करवीत होतों व स्वतः उत्पन्नाचीच काय ती काळजी वाहत होतों. पण आतां हें माझें सारें सौभाग्य कायम ठेवणें तुझ्याच हातीं आहे. याचा विचार कर व ह्या म्हाताऱ्याची तुला कींव येऊं दे. '

पुत्रशोकाने वेडा नि आगतिक झालेल्या वृद्ध सासऱ्याची ही विनवणी ऐकून दयाळू अहल्येच्या अंतःकरणाला पाझर फुटला. दुःखाचा आवेग ओसरला. कर्तव्यनिष्ठा जागृत झाली. पेशव्यांच्या नेतृत्वाखाली स्वपराक्रमावर उदयास येऊन माळव्यांत 'सुभेदारी' मिळविलेल्या होळकराची मी सून आहें, या गोष्टीचीं जाणीव होऊन अहल्येने सासऱ्याच्या इच्छेला मान दिला; आणि दुःख आवरून, पदर सावरून, कंबर बांधून ती कर्तव्याला लागली. तिच्या या तेजस्वी नि समंजस वर्तनानें मल्हाररावास धीर आला. दौलतीचीं कामें सुनेवर सोपवून, प्रसंगी तिला रागालोभाचीं पत्रें पाठवून मल्हाररावाची घोडदौड पुन्हा सुरू झाली. अहल्याबाईस मालेराव नांवाचा मुलगा व मुक्ताबाई नांवाची मुलगी होती. मल्हारराव होळकर मोहिमेवर असतांना इ. स. १७६६ सालीं अलमपुराजवळ मृत्यु पावला. त्याच्या मागे नातवास—मालेरावास—पेशव्यांनी सरदारकीची वस्त्रें दिलीं.

अहल्याबाईच्या लोकोत्तर जीवनाचें साधारणपणें तीन टप्पे किंवा भाग पडतात. तिचें खाजगी जीवन, राज्यकारभार आणि धार्मिक जीवन. खाजगी जीवनांत बाई अतिशय दुर्दैवी होती. कौटुंबिक आपत्तींमुळे तिचें सारें जीवन दुःखमय झालें होतें—करपून गेलें होतें. कुटुंबांतील साऱ्या माणसांचे मृत्यु पाहण्याचा प्रसंग तिजवर यावा यापेक्षा दुःखद नि शोककारी घटना ती कोणती? पेशवे कुटुंबांत असे आघात सोसण्याचा प्रसंग गोपिकाबाईवर आला होता. अहल्येचे या बाबतींत गोपिकाबाईशीं फार साम्य आहे. धर्मनिष्ठेचे आणि करारीपणाचे धडे जिच्याकडून घेतले ती सासू—गौतमाबाई १७६१ सालीं वारली. त्यानंतर पांच वर्षांनीं प्रेमळ सासऱ्याचें छत्र उडालें. तिच्या सौभाग्याचा नंदादीप तर ऐन उमेदींत नि रणधुमाळींत विझून गेला होता (१७५४). सासऱ्याच्या निधनानंतर अहल्येचा मुलगा मालेराव सुभेदारीवर आला. पण हा मुलगा करंटा नी अल्पायुषी निघाला. एकवीस वर्षांचें हें तरणेबांड पोर अवखळ, चंचल बुद्धीचें नि व्यसनी होतें. त्याची आई अहल्या उदार नि धार्मिक वर्तमानाची, तर हा अगदी उलट. आई ब्राह्मणांना दानधर्म करी हें त्याला पाहवत नसे. ब्राह्मणांच्या तो खोड्या काढी. त्यांच्या जोड्यांत नि उपरण्यांत विंचू लपवून ठेवी. ब्राह्मणांना ते चावले म्हणजे याला आसुरी आनंद होई. अहल्येला त्याच्या या व्रात्यपणाचा खूप राग येई, पण तिची

कांहीं मात्रा चालत नसे. मालेरावाची एक रक्षा होती. तिच्यावर एका शिंप्याची नजर आहे असा संशय येतांच मालेरावाने त्याचा खून केला. पुढे मालेराव अकस्मात् आजारी पडला. त्याला रात्रंदिवस शिंप्याचें भूत दिसे. 'मला निरपराध्याला मारलेंस, तुझा सूड घेईन' असें तें भूत वारंवार बोले व त्यामुळे मालेरावाची स्थिति मोठी अनुकंपनीय व क्षीण झाली. आपल्या या एकुलत्या एक मुलाच्या अंथरुणापाशीं अहल्या कायम बसून असे, व त्याची सेवाशुश्रूषा करी. आईचं अंतःकरण अवगुणी मुलाचा जीव वांचवण्यासाठी तिळतिळ तुटत होतं. भुतापुढे तिनं पदर पसरला. 'बाबा माझ्या मुलाला सोड. तुझ्या नांवानं देऊळ बांधेन. तुझ्या वारसांना धनदौलत देईन. पण वांचव माझ्या लेकराला.' पण लेकरू वाचायचं नव्हतं. सुभेदाराचीं वस्त्रं पेहरून दहा महिने लोटतात न लोटतात तोंच मालेराव २७–३–१७६७ रोजी मृत्यु पावला. पतिवियोग आणि पुत्रशोक अशा दुहेरी आघातांनी अहल्याबाईस जीवन नकोसें झालें.

बाईस मायापाश आता एकच होता आणि तो म्हणजे मुलीचा-मुक्ताबाईचा! मालेरावाहून ही तीन वर्षांनी लहान. स्वभावाने आईसारखीच प्रेमळ नि धार्मिक वृत्तीची होती. उपवर होतांच यशवंतराव फणसे नामक सरदाराशीं तिचें लग्न झालें. १७६७ सालीं या उभयतांना पुत्ररत्न झालें. त्याचें नांव धोंडिबा ऊर्फ नथ्याबा ठेवण्यांत आलें. या नातवावर अहल्येची फार माया होती. होळकरांच्या गादीचा तोच वारस होणार होता. नथ्याबा तेरा वर्षांचा झाला तेव्हां अहल्याबाईनें त्याचें लग्न थाटामाटांत केलें. बाईस दोन भाऊ होते. त्यांपैकीं एकाची नातच तिने आपली नातसून करून घेतली. पण कठोर दैव अहल्येच्या पाठीमागें जणूं हात धुऊन लागलें होतें. बाई एवढी धार्मिक, दानधर्म करणारी; पण दैवानें तिजवर किती कौटुंबिक आघात केले! अहल्येची एकप्रकारें सत्त्वपरीक्षाच देव पाहत होता! अहल्येच्या जागीं सामान्य माणूस असता तर त्याचा देवाधर्मावरील विश्वास पार उडून गेला असता. पण अहल्या ही असामान्य स्त्री होती. निश्चयाचा महामेरु होती. पूजा, प्रार्थना, पुराणश्रवण, दानधर्म, व्रतवैकल्यें, उपास, यात्रा या तिच्या कार्यक्रमांत कौटुंबिक आघातांनीं कधींहि खंड पडला नाहीं. फलाची अपेक्षा न करतां धर्माचरणाचें हें व्रत तिनें आमरण चालविलें. तिची निष्काम धर्म-

निष्ठा अतुलनीय होती. ज्या नातवाला ती होळकरांच्या गादीचा वारस करणार होती, त्याला क्षय लागला. आणि १५-११-१७९० रोजीं तो मृत्युमुखीं पडला. आघाताचें हें दुष्टचक्र इथेंच संपलें नाहीं. यानंतर थोड्याच दिवसांनीं जावईबुवा एकाएकीं निधन पावले. अहल्येची लाडकी मुक्ता विधवा झाली. वैधव्याचा हा आघात न सोसवून ती सती जायला निघाली. आणि मग मात्र अहल्याबाईचें अंतःकरण दुभंगून तिने दुःखाचा हंबरडा फोडला. धरणीवर लोळण घेऊन अहल्येने आपल्या मुलीचे पाय धरले. आणि आक्रान्त करून ती म्हणाली, ' मुक्ता, तूं गेलीस तर मी कुणाच्या तोंडाकडे पाहून जगूं ? मला आतां तुझ्याशिवाय कोण आहे ? मी आता म्हातारी झालें. थकलें. मला सोडून नको गं जाऊस. ' पण मुक्ताबाईचं मन विरघळेना. विरघळलं तरीं सती जाण्याचा निश्चय ढळेना, कारण तिच्याहि जीवनांत आता राम उरला नव्हता. आईला उठवून, तिच्या गळ्यांत गळा घालून डोळे पुसत ती म्हणाली, ' आई, तूं आता म्हातारी झालीस. थोड्या दिवसांची सोबतीण आहेस. माझा नवरा गेला, पोरं गेलं. आता मागं कशापायी राह्यचं ? तूं तर थोड्या दिवसांची सोबतीण. आजवर सोसलंस तसंच आणखी थोडं सोस. देव तुझा पाठीराखा आहे. तुला तो बळ देईल. मला सती जाऊं दे. माझ्या आयुष्यांत अशी नामी संधी पुन्हां यायची नाहीं. आई, सोड मला. पायां पडतें. आशीर्वाद दे. मला माझ्या पतिचरणीं जाऊं दे. '

पतिधर्माचें हें उज्ज्वल, उदात्त आणि आर्त आवाहन पोटच्या लेकीच्या तोंडून ऐकतांच अहल्याबाई शोक आवरून दूर सरकली. अश्रुधारा थांबल्या होत्या आणि मायेचं अंतःकरण काय तें आक्रंदन करीत होतं. यशवंतराव आणि मुक्ताबाईच्या जळत्या चितेभोवती हजारो प्रजाजन गोळा झाले होतें. अहल्याबाईस दोघां ब्राह्मणांनीं धरून कशीबशी उभीं केली होती. लवकरच अग्नि देण्यांत आला. चिता धुमसूं लागली. ज्वाला दिसूं लागल्या. अहल्याबाईच्या अंतःकरणांतून मायेच्या सहस्त्रधारा डोळ्यांवाटे वाहूं लागल्या. चिता विझत आली. नर्मदेवरील महेश्वराचा घाट निर्मनुष्य झाला. अहल्याबाई जड पावलानें वाड्यांत आली. तिला अन्न गोड लागेना की झोप येईना.

खाजगी जीवनांत इतके कौटुंबिक आघात झाले असतांहि अहल्याबाईनें आपल्या वांट्याला आलेली कर्तव्यकर्में चुकवलीं नाहीत कीं धार्मिक

आचरणांत खंड पडू दिला नाही. पुत्राच्या निधनानंतर राज्यकारभाराची धुरा संपूर्ण तिजवरच पडली. बाईने १७६७ ते १७९५ पर्यंत म्हणजे जवळजवळ सत्तावीस अठ्ठावीस वर्षे होळकरशाहीचा कारभार केला, आणि तोहि चोखपणें केला. बाईच्या कारभाराचे दोन भाग असत. एक खाजगी व दुसरा दौलतीचा. कारभार नीट चालावा, दौलतीचें रक्षण व्हावें, वैभव वाढावें यांसाठी बाईने फौजेची व्यवस्था तुकोजीराव होळकरावर सोपवली. तुकोजी मल्हाररावाच्या तालमींत तयार झालेला रणमर्द नि विश्वासू सरदार होता. अहल्येने फौजेची सारी व्यवस्था त्याचेकडे सोपवून एकप्रकारें कृतज्ञता व्यवहारचातुर्यच दाखवलं. तुकोजी बाईपेक्षा दोनतीन वर्षांनी मोठा होता. पण तिला मातेसमान मानी. मुलूखगिरीवर असतां अधूनमधून त्याला बाईकडे पैशाची मागणी करावी लागे, कधी कधी कुटिल दिवाणाच्या संगतीने तो अप्रामाणिकपणाने वागे. अशा वेळीं एरवीं मृदु असणारी बाई आपला स्वाभिमान आणि तेज चांगलेंच प्रकट करी; आणि सर्वांवर वचक बसवी. तुकोजीचा वरचढपणा वाढत चालल्याचें लक्षांत येतांच मध्यस्थाजवळ बाई निक्षून बोलली 'तुकोजीबावाचे इतके दिवस वांकडें पाऊल पडलें नाही, परंतु चार पांच वर्षे उभयतांच देशी होतें, तेथें उभयतांची मसलत जशी झाली असेल, तशी यांची पावलें पडत जातात. असो. काय चिंता आहे? तुमचें मानस असेल की, बाईस चहूंकडून उपद्रव झाल्याने सारेच बंदोबस्त आपण केल्यावर बाईनी काय करावयाचें आहे? परंतु तुम्हांसहि कळलें असू द्या, **मी सुभेदाराची सून आहें.** केवळ तुकोजीबाबाच दौलतीचें धनी आणि मी कशांत नाहीं असें समजू नका. तुकोजीबाबा हे माझे हातचे कामास लावलेले आहेत. त्यांणी निमकहरामीचे फंद आम्हांसी केल्यास, पुढें सुखरूप दौलत करू म्हणतील तर त्या गोष्टी दुरापास्त आहेत. फार खराब होतील.' अर्थात् असे खटके उभयतांत थोडे झाले. नारो गणेश या कारस्थानी दिवाणाची संगति सुटतांच तुकोजीनी अहल्याबाईचे संबंध पुन्हां सुधारले. खर्ड्यांच्या लढाईला पेशव्यांकडून निमंत्रण येतांच तुकोजीने बाईच्या पायांवर डोकं ठेवलं आणि मगच तो लढाईवर निघाला.

अहल्याबाईनें कारभार अत्यंत समजूतदारपणें, धीरानें आणि न्यायीपणानें केला. पेशव्यांशी तिची जबरदस्त निष्ठा होती. महादजी शिंद्यांशी

तिचे सलोख्याचे संबंध होतें. माधवराव, सवाई माधवराव आणि विशेषतः नाना फडणीस यांच्याविषयी तिला फार आदर होता. राजपुतांवर मिळविलेल्या अहल्याबाईच्या एका विजयाची वार्ता ऐकतांच नाना फडणीसाने तिची पुढील शब्दांत प्रशंसा केली, 'शापादपि शरादपि' असे बायकांत अहल्याबाई दिसण्यांत आली. आजपावेतो बाईची स्नानसंध्या धर्माची प्रवृत्ति ऐकण्यांत आली होती. आज पराक्रमाची गोष्ट मोठीच केली. पुण्याचा दरवाजा म्हणजे माहीष्मती नर्मदातीर आम्हांस आज समजलें,' अहल्याबाईजवळ गोविंदपंत गानू नांवाचा दिवाण होता. तो अतिशय हुशार व निष्ठावान् होता. बाईच्या यशस्वी कारभाराला आणि राज्याचा चोख बंदोबस्ताला त्याचा मोठाच हातभार होता. गोविंदपंतांपूर्वी गंगोबातात्या नांवाचा दिवाण होता. पण तो अतिशय स्वार्थी नि कारस्थानी होता. मालेरावाच्या मृत्यूनंतर गंगोबातात्याने राघोबादादा पेशव्याशीं संधान बांधून एक मोठें कारस्थान रचलें होतें. अहल्याबाईच्या दौलतीवर डोळा ठेवून राघोबा फौज घेऊन माळव्यांत चालूनसुद्धा आला. पण सद्‌गुणी नि निग्राहक माधवराव पेशव्याने अहल्याबाईची न्याय्य बाजू उचलून धरल्यामुळें राघोबाला इंदुरांतून मान खालीं घालून दक्षिणेंत परतावें लागलें. बाई मनाची अशी थोर कीं, या प्रसंगीदेखील तिने राघोबाला सन्मानाने वागवून त्याला निरोप दिला. बाईच्या दयाळू, परोपकारी, करारी आणि न्यायी वर्तनाची साक्ष देणाऱ्या कितीतरी हकिगती सांगतां येण्यासारख्या आहेत. एकच सांगितली तरी तिच्या उदात्त वर्तनावर प्रकाश पडेल. नारो गणेश नामक कारभाऱ्याने तिच्या दौलतीला सुरुंग लावण्याचें कारस्थान रचलें होतें. त्यानंतर तुकोजीवर छाप पाडून त्याने बाईविषयी त्याचें मत कलुषित केलें. तुकोजी मूळचा सरळ शिपाईगडी. नारो गणेशाचा कुटिल हेतु समजतांच त्याने त्याला अमानुष अशी कडक शिक्षा केली. छळ केला. पण अहल्याबाईस तुकोजीचें हें वर्तन रुचलें नाही. नारो गणेशाच्या मागे त्याच्या मुलावर अहल्येने कृपा केली. इतकेंच नव्हे तर, त्याच्या पत्नीच्या गर्भाधानप्रसंगीं बाईने ४०० रु. भेटीदाखल दिले. वैरभावना किती ताणायची, राग कितपत धरायचा, लढाई केव्हां करायची, तह केव्हां करायचा, वाटाघाटी कशा करायच्या या सर्व गोष्टी अहल्याबाई चांगल्या रीतीने हाताळीत असे. तिच्या कनवाळू आणि

परोपकारी वृत्तीला अपार दानधर्माची जोड मिळाल्यामुळे तिच्या अंगीं विलक्षण समंजसपणा आणि विवेक आलेला होता.

अहल्याबाई ही पुण्यश्लोक अहल्या किंवा देवी अहल्या या नांवाने अखिल भारतांत विख्यात आहे. दानधर्माला तिच्या जीवनांत पहिलें स्थान होतं. मल्हारी मार्तंड हें होळकर घराण्याचें दैवत होतें. अहल्याबाई शंकराची निस्सीम उपासक होती. भारतांतील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रीं आणि पुण्यक्षेत्रीं बाईने अनेक मंदिरें बांधलीं, जुन्या देवालयांचे जीर्णोद्धार केले, धर्मशाळा बांधल्या, घाट बांधले, विहिरी तलाव खोदले, रस्ते बांधले, वाटसरूंसाठी पाणपोया उभारल्या. गंगेच्या कावडी रामेश्वरी नेल्या. फार काय पशुपक्ष्यांची-सुद्धां तिने काळजी वाहिली. लाखों रुपयांची खाजगी दौलत तिने देवाधर्मापायी खर्चिली आहे. अलौकिक धार्मिक औदार्य आणि असामान्य प्रजावात्सल्य दाखवून जिने भारतीय संस्कृतीची आणि भारतीय स्त्रीत्वाची ध्वजा चिरंतन फडकावीत ठेवली त्या पुण्यश्लोक अहल्येची थोरवी किती वर्णावी ? महाकवि मोरोपंत, शाहीर अनंतफंदी आणि प्रभाकर यांनी अहल्याबाईची कारकीर्द पाहिलेली, अनुभवलेली आणि ऐकलेली होती. त्यांच्या प्रशंसेचें मोल केव्हाहि अधिक. म्हणून ती देणें आवश्यक आहे. बाईचे आदर्श धर्मजीवन पंतांच्या पुढील आर्येंत वर्णिलें आहे—

**देवि अहल्याबाई ! झालीस जगत्त्रयांत तूं धन्या ।**
**न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या ॥**

शृंगारांत रमणाऱ्या शाहीर प्रभाकराने अहल्येवरील अप्रतिम पोवाड्यांत तिची सत्कीर्ति अशी गायिली आहे—

**सति धन्य धन्य कलियुगीं अहिल्याबाई ।**
**गेलि कीर्ति करूनिया भुमंडलाचे ठायीं ॥ धृ ॥**
**महाराज अहिल्याबाई पुण्यप्राणी ।**
**संपूर्ण स्त्रियांमधीं श्रेष्ठ रत्नखाणी ॥**
**दर्शनें मोठ्या पापाची होईल हानी ।**
**झडतात रोग पापांची होईल हानी ॥**

**वर्णिती कीर्ति गातात संत ते गाणी ।**
**झाली दैववशे तीं होळकराची राणी ।।**
**संसारीं असून तिच्या वासना मेल्या ।**
**तिजपुढे सहज मग मुक्ति उभ्या ठेल्या ।।**

नाना फडणीस, मोरोपंत आणि सर जॉन माल्कमसारखा बडा इंग्रज अधिकारी यांच्यासारख्या समकालीनांना जिने आपल्या सत्चारित्र्यानें भुरळ घातली ती अलौकिक पुण्यशील स्त्री १३-८-१७९५ रोजीं, श्रावण वद्य चतुर्दशीस नर्मदातीरीं महेश्वर येथें आपल्या वाड्यांत शांत चित्तानें परमेश्वराची आराधना करीत निधन पावली. महेश्वरास आजहि अहल्येची भव्य छत्री उभी आहे. पिढ्यान्‌पिढ्यांना भारतीय स्त्रीत्वाचें ती उदात्त दर्शन घडवीत आहे. पुराणांतल्या अहल्येपेक्षांहि सुभेदार होळकराच्या या पुण्यशील तेजस्वी सुनेची स्मृति अधिक पापनाशक आहे.

* * *



# ६ : राणी बायजाबाई

मराठ्यांच्या इतिहासांत राजकारण करणाऱ्या ज्या थोड्या स्त्रिया होऊन गेल्या त्यांत ग्वाल्हेरच्या राणी बायजाबाई शिंदे यांचा क्रम फार वरचा लागेल. बायजाबाईंची योग्यता आणि भाग्य असें की, तिने नुसतें राजकारण केलें नाही, तर प्रत्यक्ष राज्य केलें. इंग्रज अधिकाऱ्यांनी आणि इतिहासकारांनी तिच्या राज्यकारभारासंबंधीं प्रशंसा केली असून प्रजाजनांना तर तिजविषयी अपार कौतुक नि भक्ति वाटत होती.

बायजाबाईला राजकारणाचा वारसा तिच्या सासर–माहेरच्या दोन्ही घराण्यांकडून मिळाला. पेशवाईअखेरच्या काळांतील एक कर्दनकाळ सरदार सर्जेराव घाटगे हे बायजाबाईचे वडील. आई बाजीराव पाटणकरांची मुलगी.

तिचें नांव होतें सुंदराताई ऊर्फ नानीसाहेब. मोठी सुशील आणि साध्वी स्त्री होती. या उभयतांना दोन अपत्यें झालीं. मुलगा जयसिंगराव आणि मुलगी बायजाबाई. तिचा जन्म सुमारें १७८५ चा आहे, बालपणीची हाकिकत उपलब्ध नाही. पण उपवर झाली तेव्हां चांगली सशक्त व सुंदर होती. बायजाबाईचे वडील शूर, महत्त्वाकांक्षी, कारस्थानी, किंबहुना क्रूर असल्या-मुळें व पुणें दरबारांत त्यांचा चांगला मान असल्यामुळें मुलगी धीट आणि राजकीय आकांक्षा बाळगणारी निघावी यांत नवल नाही.

बायजाबाईचा विवाह ग्वाल्हेरचे सरदार दौलतराव शिंदे यांच्या बरोबर दि. २६ फेब्रुवारी १७९८ रोजीं पुण्यांत अतिशय धामधुमीच्या काळांत, पण अति थाटामाटांत झाला. दौलतराव हे महादजी ऊर्फ पाटील बाबांचे दत्तक पुत्र. प्रत्यक्ष पुतण्याच होता व त्याच्यावर महादजीची विशेष मर्जी होती. महादजी पुण्याला वारल्यावर त्यांच्या थोरल्या पत्नीच्या मांडीवर आनंदरावास दत्तक देऊन त्याचें नांव दौलतराव ठेवलें. दौलतराव आणि बायजाबाई यांचा विवाह अनेक दृष्टींनी त्या काळीं गाजला. दौलतरावाचें कुळ शुद्ध नाही, अस्सल नाही अशीं त्याकाळीं बोलवा होती व ती कांहीशी खरी होती. आपल्या कुलाला लागलेला कलंक धुऊन काढावा अशी दौलतरावाची साहजिकच इच्छा होती. एखाद्या उच्चकुलीन खानदानी मराठा सरदाराशी सोयरीक जुळवून हा कलंक नाहीसा होईल व आपल्या घराण्याला प्रतिष्ठा येईल असें त्याला वाटूं लागलें. दौलतरावास पेशव्यांनी सरदारीचीं वस्त्रें दिलेली होतीं. त्याची वृत्ति काहीशी चैनी, सुखासीन होती. पदरी कवाईती लष्कर होतें. महादजींची पूर्वपुण्याई होती. सवाई माधवरावांच्या अकाली अपघाती निधनामुळें पुण्यांत पेशवाईच्या गादीबद्दल राजकारण शिजत होतें. राघोबाचा करंटा पुत्र दुसरा बाजीराव जुन्नराहून पुण्यास आला आणि त्यानें गादी मिळविण्यासाठीं नाना खटपटी चालविल्या. बायजाबाईच्या वडिलांस अनुकूल करून घेतलें. दौलतराव शिंद्यास प्रलोभन दाखवलें. इतकेंच नव्हे तर उपवर बायजाबाईच्या सौंदर्याची तारीफ करून दौलतरावांशीं तिचा विवाहयोगहि त्यानें जुळवून आणला. बाजीराव पेशवाईचा धनी होणार हें जाणून सर्जेराव घाटग्यानें आपली रूपसंपन्न मुलगी दौलतरावास देऊं केली आणि अशा प्रकारें राजकारण आणि सौंदर्यकारण यांचा अपूर्व मेळ बसून बायजाबाई दौलतरावाची

राणी झाली. बाजीराव पेशवा झाला. दौलतरावास सुंदर भार्या नि बाजीरावाकडून भरपूर पैसा मिळाला आणि सर्जेराव घाटग्यास पुरातन जहागीर मिळून शिवाय दौलतरावाची दिवाणगिरी मिळाली. सर्जेरावाच्या मदतीनें बाजीरावानें नाना फडणिसास अटक केली आणि अनिर्बंध कारभार सुरू केला. लग्नांत दौलतरावानें अमाप खर्च केल्यामुळें त्याला कर्ज झालें. तिकडे इंदुरला स्वराज्यांत कारभाराचीं घडी विस्कटून गेली होती. सैन्यांत बेबनाव होऊं लागला. अखेर परिस्थितीचें गांभीर्य जाणून दौलतराव बायजाबाईसह इंदुराकडे निघून गेला.

सर्जेराव घाटगा जावयाचा दिवाण झाला खरा. पण पुढे नसत्या उपद्व्यापांमुळें जावयासहि डोईजड झाला. सर्जेरावानें इंदूर लुटल्यामुळें शिंदे-होळकरांचें वितुष्ट आलें. इकडे याच वेळीं बाजीरावानें वसईला तह करून आपल्या हातानें स्वराज्यास सुरुंग लावला. शिंदे—होळकर, भोसले या पराक्रमी सरदारांना बाजीरावाचें हें पडखाऊ धोरण मान्य नव्हतें. त्यांनी इंग्रजांशीं दोन हात करायचें ठरविलें. पण त्यांत दौलतराव शिंदा अपयशी ठरला. १८०३ व १८०५ सालीं दोनदां लढाया व तह होऊन दौलतरावास इंदोरची दौलत बाळगून स्वस्थ बसावें लागलें. तहांतील एका कलमान्वयें राणी बायजाबाईस दोन लाखांची स्वतंत्र जहागीर व कन्या चिमणाबाईस एक लाखाची जहागीर देण्यांत आली. यानंतरच्या काळांत दौलतराव इंग्रजांशीं स्नेह बाळगून आपल्या मगदुराप्रमाणें संस्थानचा कारभार पाहत होता. बायजाबाईवर त्याचें अत्यंत प्रेम होतें. कारभाराच्या हरएक बाबींत तो बायजाबाईचा सल्ला घेत असे. तिनें आपल्या सौंदर्यानें आणि कर्तबगारीनें पतीवर चांगली छाप पाडली होती. पूर्वीं पतीबरोबर ती स्वारी शिकारीवर जात असे. त्यामुळें घोड्यावर बसणें, भाला फेंकणें, बंदूक उडवणें इत्यादि गोष्टींचा तिला चांगला सराव झाला होता. विशेषतः घोड्यावर बसण्यांत ती पटाईत झाली होती. अश्वपरीक्षाहि तिला चांगली अवगत होती.

बायजाबाईच्या जीवनांत तिला पहिला मोठा कौटुंबिक आघात सोसावा लागला तो तिच्या वडिलांच्या खुनाचा. सर्जेराव दिवसेंदिवस आपल्या मुजोर वर्तनानें दरबारांत अप्रिय होऊं लागले होते. दि. २६-७-१८०९ रोजीं मानाजीच्या मुलानें आणि आनंदराव नांवाच्या सरदारानें त्यांचा खून केला.

या पुढच्या काळांत खुद्द दौलतरावाच्या चित्तासहि स्वस्थता नव्हती. खर्चीक स्वभावामुळें राज्याला कर्ज झालें होतें. अंमलदार शिरजोर होऊं लागले. अधूनमधून पेंढारी प्रजेला उपद्रव देत. या सर्वाला कंटाळून दौलतरावानें १८१७ रोजीं इंग्रजांशीं नवा तह करून त्यांच्या सैन्याची मदत घेतली. अर्थात् यापायीं कांहीं मुलूख गमवावा लागला. १८२६ पासून दौलतरावाची प्रकृति बिघडूं लागली. त्याला उदराची व्यथा होती. बायजाबाई व तिचें बंधु हिंदुराव दौलतरावाच्या बिछान्याजवळ बसून सतत सेवा-शुश्रुषा करीत होतें. वैद्यहकीमांकडून नाना औषधोपचार झालें. पतीच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून संक्रांतीच्या सणाला बायजाबाईनें पुष्कळ दानधर्म केला. गोप्रदानें केली. प्रायश्चित घेतलें. ब्राह्मणभोजनें घातलीं. पण गुण येईना. बायजाबाईच्या सौभाग्याची दौलत दिवसेंदिवस निस्तेज पडूं लागली. हातपाय सुजत चालले. घरांत थोरली सवत रखमाबाई होती. अगदी साधी भोळी. नवऱ्यासकट सर्वांकडून उपेक्षिलेली. प्रकृति बरी होण्याचें चिन्ह दिसेना तेव्हां दौलतरावास इंग्रज रेसिडेंटासकट सर्वांनीं दत्तकाचा आग्रह केला. पण दौलतरावास दत्तकाची कल्पना रुचेना. त्यानें रेसिडेंटास आत्मविश्वासानें अखेरचे सांगून टाकलें कीं, ' माझी धाकटी बायको चतुर, शहाणी व कर्ती आहे. माझ्या मागे तीच कारभार पाहील. ' यानंतर दौलतराव फार जगले नाहींत. माघ वद्य ७ शके १७४८ रोजीं ग्वाल्हेरच्या दौलतीचा राव आपल्या पत्नीच्या कर्तृत्वावर हवाला ठेवून निधन पावला. राणी बायजाबाईस अपार शोक झाला. योग्य समयीं तिनें पुढें पतीची छत्री बांधली. आणि तिच्या व्यवस्थे-साठीं सालीना उत्पन्न लावून दिलें.

पतिनिधनानंतर बायजाबाईने कारभार हातीं घेतला खरा, पण हा कारभार सुरळीतपणें करणें सोपे नव्हते. बायजाबाईला जवळचे विश्वासाचें माणूस म्हणजे बंधू हिंदुराव घाटगे. याशिवाय काभारभाराला लोकाभिमुखता व प्रतिष्ठा यावी म्हणून तिने दहाबारा मंत्र्यांची नेमणूक केली. बापूजी रघुनाथ, यशवंतराव दाभाडे, यशवंतरावभाऊ बक्षी, लाला भाऊ, फकीरजी गाढवे, उदाजी कुटके, माधवराव ब्रम्हाजी, लक्ष्मणराव विठ्ठल, रामराव फाळके, मणीराम शेठ, दार्जीबा पोतनीस, आत्माराम पंडित, कर्नल जेकब, कर्नल जॉन फिलोज, मेजर अलेक्झॅंडर इत्यादि मंत्री, अधिकारी तिच्या

कारभाराचे आधार होतें. यांच्या मदतीनेंच पांच सहा वर्षें तिने उत्तमप्रकारें कारभार करून प्रजेकडून भलेपणा मिळवला. तिच्या कारकीर्दीत सर्वसाधारणपणें प्रजा सुखी होती. फौजेची व्यवस्था चोख होती. पेंढारी व ठकांचा बंदोबस्त करण्यांत तिनें जातीनें लक्ष घातलें. मक्त्याच्या मामलतीची एक जुलमी चाल होती ती तिने बंद करून वसुलीच्या बाबतींत सुधारणा केली. १८३३ सालीं तिचा चतुर दिवाण रावजी त्रिंबक मृत्यु पावला. त्यानंतर सखो शामजी व दादा खाजगीवाले यांच्या सल्याने ती कारभारांत जातीने लक्ष घालूं लागली. तिच्या कारभारावर त्यावेळचे इंग्रज रेसिडेंट, गव्हर्नर जनरल आदि खूष होते. आपल्या कारभारांत दोष काढण्याला किंवा लक्ष घालायला तिनें प्रजेलाच काय, पण इंग्रजांना सुद्धां फारसा वाव दिला नाहीं. पण नियतीचा नियमच असा आहे कीं, तिला एकाद्याचें नीट चाललेलें पाहवत नाहीं.

बायजाबाईच्या राणीपदाला तिच्या दत्तक मुलानेच कुसंगतीमुळे सुरूंग लावला आणि इंग्रजांनी या कारस्थानाकडे सहेतुकपणें दुर्लक्ष केलें. इतकेंच नव्हे तर बायजाबाईच्या लोकप्रियतेची धास्ती घेऊन त्यांनीच मायलेकरांत वितुष्ट आणून आपल्याला हवें असणारें कळसुत्री बाहुले ग्वाल्हेरच्या गादीवर आणलें. बाई गादीवर आली तेव्हा वडीलधाऱ्यांच्या आणि अनुभवी सरदारांच्या आग्रहाला मान देऊन शिंदे घराण्यांतील एक चुणचुणीत मुलगा तिने दत्तक घेतला. मुलगा दहाबारा वर्षांचा होता. दत्तविधान १८२७ च्या जून महिन्यात झालें, व त्याचें नांव जनकोजी ठेवण्यांत आलें. इतकेंच नव्हे तर याच समयी त्याला राज्याभिषेक करवून आपल्या नातीशीं त्याचें लग्नहि लावून दिलें. हे सारें विधि बायजाबाईने अत्यंत हौसेनें व थाटामाटाने केले. पण तिच्या नशिबीं या पुत्राकडून सुख नव्हतें. वंश चालावा, गादीला वारस असावा या हेतूने तिने ज्याला पुत्र म्हणून मांडीवर घेतलें, तोंडात मायेने साखर घातली तोच पुत्र मोठा झाल्यावर बिघडला आणि आईला उपद्रव देऊं लागला. जनकोजीची बुद्धि मुळात बेताची होती व त्याला संगति चांगली नव्हती. म्हणून बायजाबाई त्याच्यावर सक्त नजर ठेवून असे. पण स्वार्थसाधु सल्लागारांनी जनकोजीचें मत आईबद्दल कलुषित केलें. आईच्या बंधनांत तुझी बुद्धि नि कर्तबगारी वाढत नाहीं असा दुष्ट सल्ला ते देऊं लागले.

दुर्दैवानें जनकोजी या सल्लागारांच्या आहारी गेला. आपले खरे शत्रुमित्र हितकर्ते कोण हें त्याला उमगलें नाहीं. मग घराण्यांत नि दरबारांत कलहाग्नि धुमसूं लागला. दरबारांत दोन तट पडले. इंग्रज रेसिडेंट तरूण राजपुत्राला आंतून अनुकूल होते. गव्हर्नर जनरलपर्यंत या कलहाच्या वार्ता पोंचल्या. यापूर्वी बायजाबाईकडून इंग्रजांनीं फौजेच्या खर्चाकरितां ८० लाख रुपये कर्ज उपटलें होते आणि दाक्षिणेंतील जवळ जवळ १० गांवें तिला इंग्रजांच्या स्वाधीन करावी लागलीं होती. त्यामुळें ती आधीच दुःखीकष्टी व असमाधानी झाली होती. तशांत आतां प्रत्यक्ष पुत्रानेच गृहकलह माजवून दिल्ली-पर्यंत दुष्कीर्ति पोंचवली होती. स्वभावाने मानी व तापट असणारी ही बाई अशा तापदायक घटनांमुळें राज्यत्याग करून जोगीण बनायची, पण या तेजस्वी स्त्रीला आपल्या कीर्तीला कलंक लावून घ्यायचा नव्हता. स्वतःचे माथी दोष घेऊन नियतीवर आपलं भवितव्य सोपवायला बायजाबाई कांहीं अबला नव्हती. घाटगे-शिंद्यांच्या रक्तावर पोसलेला तिचा पिंड अबलेचा नव्हता. तर सबलेचा होता. गव्हर्नर जनरलच्या भेटींत समक्षच गृहकलहाचा एकदां सोक्षमोक्ष लावायचा असा तिने निर्धार केला.

दरम्यान इंग्रज रेसिडेंट आणि जनकोजी यांच्यांतील सलोखा वाढत होता. १८३० मध्यें जनकोजीची पत्नी, बायजाबाईची नात निधन पावली. जनकोजीनें लगेच दुसरे लग्न केलें. या लग्नांतील दारुकामाचे प्रसंगीं त्याने एका माणसाच्या अंगावर बाण सोंडल्यानें तो मनुष्य भाजून मेला. बायजाबाईस या घटनेने अतिशय राग आला. पण आतां ती मुलाला आवरूं शकत नव्हती. कारण इंग्रजांची फूस असल्यामुळें तो आईला जुमानीनासा झाला होता. १८३२ च्या डिसेंबरांत गव्हर्नर जनरल बेंटिंग संस्थानच्या कारभारांत सलोखा करण्यासाठी ग्वाल्हेरला आला. बायजाबाई व जनकोजी हे दोघेहि मोठ्या थाटामाटानें पण स्वतंत्ररीत्या गव्हर्नर जनरलच्या भेटीला गेले. सजवलेल्या तंबूत बाईनें पडद्याआडून दुभाषामार्फत गव्हर्नर जनरलशीं दरबारच्या दुफळीबद्दल बोलणें केलें व आपली बाजू धीटपणें मांडली. बाईच्या प्रांजळ व धीट बोलण्याची गव्हर्नर जनरलवर चांगली छाप पडली. जनकोजी भेटीला आल्यावर गव्हर्नर जनरलनें बाईची बाजू घेऊन त्याची समजूत घातली व आईशीं सलोख्यानें वागण्याचा सल्ला दिला.

गव्हर्नर जनरलच्या सल्ल्यानुसार जनकोजी कांही दिवस बायजाबाईशी गुण्यागोविंदाने वागत होता. पण स्वार्थी व कुटील सरदारांच्या संगतीमुळें बायजाबाईशी तो पुन्हां शत्रुत्वानें वागूं लागला. बायजाबाईला पदच्युत करून सर्व सत्ता आपल्या हातीं घेण्याच्या तो उद्योगाला लागला. बाई विरूद्ध अनेक कागाळ्या गव्हर्नर जनरलकडे जाऊं लागल्या. कट शिजूं लागले. कारस्थानें बळावली. १८३३ च्या जुलैत जनकोजीने जवळजवळ बंड पुकारून बायजाबाईस कैद करण्याचा बेत केला. पण तो फसला. बाईचें या सर्व घटनांकडे लक्ष होते. धीराने ती आल्या प्रसंगाला तोंड देत होती. पहिला बेत फसल्यावर जनकोजीने नवा कट उभारला. त्याचा सुगावा लागून बायजाबाई आपल्या भावाच्या वाड्यांत पळाल्या व तेथून गुप्तपणें इंग्रज रेसिडेन्टच्या आश्रयाला गेल्या. रेसिडेन्ट वगैरे इंग्रज अधिकारी जनकोजीस आधींपासून अनुकुल असल्यामुळें त्यांनीं बायजाबाईस साळसूदपणें ग्वाल्हेर सोडण्याचा सल्ला दिला. आतां बाईचा नाइलाज झाला होता. तिचें वय झालें होतें. व तिच्यावर आलेल्या कठीण प्रसंगीं स्वजनहि तिला सोडून गेले होते. थोडी इमानी फौज घेऊन बाईने ग्वाल्हेर सोडलें. व सहा मैलांवर कसोली येथें ती गेली. तेथून ती धोलपूरला गेली व शेवटीं आग्र्याला तिनें आश्रय घेतला. वाटेंत तिचे पुष्कळ हाल झाले. आग्र्याहून तिनें गव्हर्नर जनरलकडे आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठी खलिते पाठवले. पण त्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करण्यांत आलें. आग्र्याच्या मुक्कामांत बाईची एकुलती एक सुस्वरूप कन्या जिमणाबाई बाळंत होऊन निधन पावली. तिच्या निधनामुळें बाईस जीव नकोसा झाला. इंग्रज वरकरणी तिची काळजी घेण्याचें नाटक करीत. आग्र्याला तिच्या जिवाला अपाय होऊं नये म्हणून फरूकाबादला तिची रवानगी करण्यांत आली. तिथें निळीच्या कारखान्यांत रहाण्याचा या राणीवर प्रसंग आला. १७३५ पर्यंत ती फरूकाबादेस होती. त्यानंतर तिच्या इच्छेनुसार अलाहाबाद व बनारसला तिला राहूं देण्यांत आलें. १८४० मध्यें गव्हर्नर जनरलच्या संमतीनें बायजाबाई नाशिकला येऊन राहिली. सरकारकडून तिला ४ लाखांचें पेन्शन मिळत होतें नाशिकला बाई १८४५ पर्यंत राहत होती.

ग्वाल्हेरींतून आईला पळवून लावल्यानंतर जनकोजी गादीवर आला.

पण राज्यांत सुस्थिरता नांदेना. आईला देशोधडीला लावल्यामुळे सर्वसामान्य प्रजाजन जनकोजीवर नाराज होते. राज्यांत शांतता होती. पण प्रजा समाधानी, आनंदी नव्हती. कालांतरानें जनकोजी महाराजांना आपल्या वर्तनाचा पश्चाताप होऊं लागला. एकदा त्यांना आईस भेटण्याची इच्छा झाली. पण सरकारच्या नकारामुळें ती सफल होऊं शकली नाही. जनकोजी राजे १८४३ च्या फेब्रुवारींत मृत्यू पावले. ते निपुत्रिक होते. कारभाऱ्यांनी त्याच्या पत्नीच्या मांडीवर दत्तक दिला. नव्या राजाचें नांव जयाजीराव ठेवण्यांत आलें. जयाजीरावाच्या कारकीर्दीत आरंभीच ग्वाल्हेर दरबारचे नि इंग्रजांचें बिनसले व लढाईचा प्रसंग आला. शिंद्यांना पराभव पत्करावा लागला. मग तह होऊन नवा राजा अज्ञान असेंतों मंत्रिमंडळानें कारभार पाहवा अशी योजना झाली. १८५३ सालीं जयाजीराव राज्यारूढ झाले. मग मात्र बायजाबाईला पुन्हां चांगले दिवस आले. नातवावर बाईची माया जडली. नातवाची कीर्ती ऐकून ती ग्वाल्हेरीस आली. आपल्या नातीच्या मुलशीं जयाजीरावाचें लग्न लावून बाईनें मायापाश दृढ केले. जयाजी-रावावर तिची ममता होती. आणि जयाजीहि आपल्या वृद्ध व थोर आजीचा मान राखत होता. बाईवरील सर्व निर्बंध दूर झाल्यामुळें ती कांहीं दिवस ग्वाल्हेरीस तर कांहीं दिवस उज्जैनीस राहूं लागली. तिचा आता वृद्धापकाळ झाला होता. तिला कोणतीहि राजकीय आकांक्षा नव्हती. देवधर्मांत ती आयुष्य वेंचत होती. जरूर पडेल तेव्हां ती नातवाला सल्ला मसलत देई. सर्वजण तिचा आदर करीत होते.

बायजाबाईचें उतार वय म्हणजे एक प्रकारें तिचा वानप्रस्थाश्रम होता. तिची रहाणी साधी होती. सत्तरीच्या घरांत गेल्यामुळें केस पिकले होते. तथापि उत्साह कायम होता आणि डोळ्यांतील चमक लहानथोरांस चमकावीत होती. इंग्रज अधिकाऱ्यांच्या बायका भेटीला जात तेव्हां त्यांच्यावर ती छाप पाडल्याविना राहात नसे. वृद्धावस्थेतहि तिच्या अंगच मूळचें सौंदर्य इंग्रज स्त्रियाच्या नजरेंत भरे. बायजाबाईची आतिथ्यशीलता आणि औदार्य—विशेषतः धार्मिक स्वरूपाचें औदार्य वाखणण्याजोगे होतें. धार्मिक असूनहि ती कर्मठ नव्हती. काशी रामेश्वरापर्यंत तिनें तीर्थयात्रा केल्या. काशीला सुंदर भव्य घाट बांधला, पंढरपूरला द्वारकाधीशाचें मंदिर बांधलें. पण हें

परमार्थसाधन चालू असताहि रोजच्या जीवनाकडे तिनें पाठ फिरविली नव्हती. नातवाच्या कारभाराकडे तिचें लक्ष होतें. स्वभावानें कडक असली तरी माणसांची ती भुकेली होती. आंग्ल स्त्रियांशीं गप्पागोष्टी करण्यांत तिला आनंद वाटे. मिसेस फेनी पार्क्स नांवाची परिचित स्त्री लंडनला गेल्यावर बायजाबाईनें तिला तीन वस्तु आठवर्णानें पाठवून देण्यास सांगितल्या. उमदी व अस्सल अरबी घोडी, सफेत, लाल डोळ्यांचें छोटें कुत्रें आणि वाद्य वाजवणारी कळसूत्री बाहुली. यावरून बाई किती रसिक आणि उमद्या मनाची होती हें चांगलें प्रतीत होतें. इंग्रजी चालीरीतींशीं परिचित असणारी ही कणखर बाई हिंदु चालीरीतींनाहि जपत असे. लाडका नातू जयाजीराव उज्जनीस एकदां बाईच्या भेटीला सुटाबुटांत गेला. बाईला ही गोष्ट समजतांच तिनें कारभाऱ्यांमार्फत निरोप पाठवला ‘ मी चाबुकस्वाराला भेटत नसतें ’. नातू काय तें उमगला आणि नेहमींच्या पेहराव करून आजीला भेटला.

बायजाबाईच्या अखेरच्या दिवसांत १८५७ चें स्वातंत्र्यसमर पेटलें. बाईला इंग्रजांनीं दुखवली असल्यामुळें व प्रजाजनांत ती फार लोकप्रिय असल्यामुळें समरप्रसंगीं ती काय करते या गोष्टीकडे सर्वांचेंच लक्ष होतें. काशीच्या मुक्कामांत बाईच्या वाड्यांतून इंग्रजांनीं सक्तीनें द्रव्य वसूल करून नेलें होतें. त्यामुळें बाई क्रांतिवीरांना सामील होणार की काय याची इंग्रजांनीं धास्ती घेतली होती. पण बाईनें आपल्या उतारवयाचा आणि इंग्रजांच्या सामर्थ्याचा विचार करून समरप्रकरणीं अगदीं अलिप्तता धारण केली. क्रांतिवीरांनीं ग्वाल्हेरवर हल्ला करतांच जयाजीराव आग्र्यास पळून गेला. ग्वाल्हेर क्रांतिकारकांनीं जिंकलें. वृद्ध बायजाबाई व इतर राण्या जवळच नरवराला आश्रयास गेल्या. क्रांतिकारकांचे नेते रावसाहेब पेशवे यांनीं बायजाबाईची योग्यता जाणून तिला दोन पत्रें पाठविली व आपला सद्धेतु सांगून ग्वाल्हेरची सत्ता हातीं घेण्याची विनंती केली. पण बाई भांबावून गेली होती. क्रांतिकारकांवर तिचा विश्वास बसेना. रावसाहेबांचीं पत्रें तिनें सरळ इंग्रज अधिकाऱ्याकडे पाठवून क्रांतिकारकांशीं असहकार केला. बायजाबाईचें हें कृत्य तिच्या आजवरच्या तेजस्वी वर्तनाशीं विसंगत होतें. तिचें पाऊणशें वयमान लक्षांत घेतां तिच्या या कृत्या-कडे सहानुभूतीनें पाहणेंच आतां जरूर आहे.

क्रांतियुद्धांत इंग्रजांची सरशी होऊन ग्वाल्हेरीस जयाजीराव पुन्हा सत्तारूढ झाले. इंग्रजांनीं जयाजीराव आणि बायजाबाई यांचा दरबार भरवून गौरव केला. यानंतरचा बाईंचा काळ कथा-पुराण ऐकण्यांत नि पूजाअर्चा करण्यांत गेला. १८६३ च्या मे महिन्यापासून बाईंची प्रकृति ढासळूं लागली. नातवानें वैद्य-हकीमांना पाचारण करून व दानधर्मादि कृत्यें करून आजीसाठीं पुष्कळ यत्न केलें. पण आजी अंथरुणांतून उठेना. आजारपणांत मोठमोठे इंग्रज अधिकारी, राजेरजवाडे तिच्या समाचाराला येत. आजारपणाच्या या काळांत जयाजी-रावांना पुत्ररत्न झालें. पणजीचा जीव या घटनेनें उल्हसून गेला. पण हा उल्हास अल्प काळचा ठरला. २७ जून १८६३ रोजीं, आषाढी एकादशीस बायजाबाई ग्वाल्हेरच्या दौलतीस अखेरचा प्रणाम करून शांतचित्तानें निधन पावली. नातवानें आपल्या कर्तबगार आणि पुण्यशील आजीच्या स्मरणार्थ छत्री बांधून वडिलांचें पाप एक प्रकारें धुऊन काढलें.

★ ★



# ७ : मॅडम कामा

**दीप्तानलांत निजमातृ-विमोचनार्थ ।**
**हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलों कृतार्थ ॥**
**तें भारतीय अबलाबल तेज कांहीं ।**
**अद्यापि या भरतभूमिंत लुप्त नाहीं ॥**

मृत्यूच्या छायेंत वावरत असतांना वीर सावरकर यांनीं जें काव्यबद्ध मृत्युपत्र लिहिलें त्यांतील या तेजस्वीं ओळी आहेत. या ओळीं गुणगुणल्या कीं, माझ्या डोळ्यांपुढें मॅडम कामाबाईची रौद्रमूर्ति उभी राहते आणि त्यांचें जीवन-कर्तृत्व आठवून मन एकप्रकारें उदास बनतें. वस्तुतः या तेजस्विनीच्या स्मरणानें उदासीन व्हायचें काय कारण? जिने पन्नास वर्षांपूर्वीच्या काळांत स्वतंत्र भारताचा ध्वज युरोपमध्यें फडकवला आणि संकटग्रस्त भारतीय क्रांतिकारकांचें मातृवत् प्रतिपालन केलें त्या वीरांगनेच्या स्मरणानें औदासीन्य कां यावें? मन उदास होतें तें यासाठीं कीं, या क्रांतिललनेला स्वतंत्र भारत जवळजवळ विसरला आहे. भारतांत अनेक

सशस्त्र क्रांतिकारकांचीं चरित्रें लिहिलीं गेलीं, पोवाडे गाइले गेले, पुतळे उभारले गेले आणि कित्येकांच्या वंशजांना सरकारी वेतनेंहि मिळूं लागलीं. अर्थात् जें झालें तें योग्यच होय. कामाबाईंच्या वांट्याला यांतलें कांहीं येऊं नये याचें वाईट वाटतें. सावरकरबंधूंच्या जन्मठेपीच्या शिक्षेनंतर कामाबाई फ्रान्समध्यें कित्येक वर्षें अज्ञातवासांत दिवस कंठीत होत्या. पुढें त्या भारतांत केव्हां आल्या नि केव्हां वारल्या याचीहि कोणी फारशी दखल घेतली नाहीं. कामाबाईंची आज जन्मशताब्दि आहे. या निमित्तानें निदान त्यांचें पुण्यस्मरण करणें सर्वांचें कर्तव्य ठरतें.

## सारेंच आगळें जीवन

गर्भश्रीमंत पार्शी जमातींतील ही संसारी स्त्री औषधोपचाराच्या निमित्तानें लंडनला जाते काय, सशस्त्र क्रांतीचीं दीक्षा घेते काय आणि त्या क्रांतिकारकांच्या दाहक हालचालींना हातभार लावते काय–सारेंच अद्‌भूत नि आगळें जीवन आहे या स्त्रीचें! कामाबाईंचे वडील शेठ सोराबजी फ्रेमजी पटेल हे व्यापारी होते. त्यांची साहाजिक इच्छा अशी कीं, आपली लाडकी भिकू श्रीमंतांची सून व्हावी. पण ईश्वराची इच्छा निराळी होती. विद्यार्थिदशेंत भिकूला सार्वजनिक कार्याची आवड उत्पन्न झाली. १८९५–९६ च्या सुमारास मुंबईंत ज्या सामाजिक चळवळी होत, त्यांत कामाबाई भाग घेऊं लागल्या. काँग्रेसच्या स्थापनेमुळें देशांत जी राजकीय जागृति उत्पन्न झाली होती तिकडेहि बाईंचें लक्ष होतें. बाई मूळच्या स्वाभिमानी, कनवाळू व चळवळ्या होत्या. स्वतःच्या मनाप्रमाणें वागण्यास त्यांना मोकळीक मिळती तर कदाचित् महिला जागृतीच्या कार्यासच त्यांनीं वाहून घेतलें असतें. पण वडीलभाऱ्यांची इच्छा कामाबाईंना मोडवेना. रुस्तुम कामाबरोबर त्यांचा विवाह झाला. रुस्तुमजी श्रीमंत व विद्याव्यासंगी होते. पत्नीच्या सार्वजनिक कार्याला आरंभीं तरी त्यांनीं उत्तेजन दिलें. पण पुढे उभयतांचें बिनसलें. पति प्रपंचवादी तर पत्नी राष्ट्रवादी. दोघांना संसार असार वाटूं लागला. सुदैवानें म्हणा कीं दुर्दैवानें म्हणा, कामाबाईंची लवकरच संसारांतून मुक्तता झाली. बाई आजारी पडून औषधोपचारासाठीं लंडनला गेल्या. पुढे योगायोगानें पं. शामजी कृष्णवर्मांशीं त्यांची गांठ पडलीं आणि त्यांच्या आयुष्याची

दिशाच बदलली. गर्भश्रीमंतींत वाढलेल्या या सुकुमार स्त्रीनें सशस्त्र क्रांतीची दीक्षा घेतली. अभिनव भारतसंस्थेच्या त्या सभासद झाल्या.

## निवासस्थान नव्हे, क्रांतिकारकांचें आश्रयस्थान

कामाबाईंचा आरंभीचा कल नेमस्त राजकारणाकडे होता, पण पं. श्यामजी कृष्णवर्मा आणि सावरकर यांचीं स्फूर्तिदायक भाषणें ऐकून त्या सशस्त्र क्रांतिवादी झाल्या. लंडनमधील हाइड पार्कमध्यें त्या स्वतःच व्याख्यानें देऊं लागल्या. त्यांचीं जहाल व्याख्यानें इंग्रज सरकारला अर्थातच मानवली नाहींत. सरकारनें बाईंना इंग्लंड सोडून जाण्याची सूचना दिली. पण तिकडे दुर्लक्ष करून बाईंनीं असंतोषाची पेरणी चालूच ठेवली. अखेर सरकारनें त्यांच्यावर पकडवॉरंट जारी केलें. पण त्याची अंमलबजावणी होण्यापूर्वीच बाईंनीं फ्रान्सकडे प्रयाण केलें. पॅरीसमधील कामाबाईंचें निवासस्थान म्हणजे भारतीय क्रांतिकारकांचें एक आश्रयस्थानच बनलें. वीर सावरकर, लाला हरदयाळ, श्यामजी कृष्णवर्मा, वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, एम्. पी. टी. आचार्य इत्यादि क्रांतिकारकांच्या साहाय्यानें कामाबाई भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळींत सक्रीय भाग घेऊं लागल्या. पॅरिस सोडून कांहीं दिवस त्यांनीं युरोपभर संचार केला. फ्रेंच व रशियन क्रांतिकारकांशीं संधान बांधलें. जिनीव्हाला मुक्काम ठोकून '**वंदेमातरम्**' पत्र सुरू केलें. बाईंच्या जहाल लिखाणानें इंग्रज सरकार अस्वस्थ झालें. फ्रेंच सरकारवर दडपण आणून त्यांनीं बाईला अटक करण्याची खटपट केली. पण तीहि साधली नाहीं. श्यामजी कृष्णवर्मांच्या 'इंडियन सोशिलोजिस्ट' या पत्रांत एक जहाल लेख लिहून बाईंनीं हिंदी क्रांतिकारकांना सशस्त्र क्रांतीची प्रत्यक्ष चेतावणीच दिली.

## ज्वलन्त राष्ट्रनिष्ठा

लाला लजपतराय व सरदार अजितसिंग यांना भारतसरकारनें हद्दपारीची कठोर शिक्षा दिल्याची वार्ता समजतांच कामाबाईंना इतका त्वेष आला कीं, त्यांनीं पॅरीसहून हिंदी लोकांना एक प्रकट पत्र लिहिलें. बाईंची ज्वलन्त राष्ट्रनिष्ठा आणि त्यांच्या मनांतील या प्रसंगीचा क्षोभ पुढील शब्दांत व्यक्त झाला आहे—

'लालाजीप्रमाणें आपण सर्वांनींच जर शूरपणाची भाषा वापरली तर आपल्याला हद्दपार करण्यासाठीं या सरकारला कितीतरी तुरुंग नि किल्ले बांधावे लागतील ! लालाजीवरील घोर अन्यायामुळें आमची तळपायाची आग मस्तकाला गेली आहे. हा अन्याय आम्ही सहन करावा असें कोणीहि विचारी माणूस म्हणणार नाही. माझ्या तर मनांत असें येतें कीं, तुरूंगाचे दरवाजे फोडावेत आणि लालाजींना मुक्त करावें.'

यापुढच्या वाक्यांत बाईंनीं जे जळजळीत शब्द लिहिले आहेत ते शब्द नसून इंग्रज सरकारवर केलेलें शरसंधानच वाटतें. 'परक्या राज्यकर्त्यांच्या आश्वासनांवर कधींहि विसंबू नका. इंग्रज हे तुमचे हितकर्ते नसून तुमची लूट करण्यासाठीं ते भारतांत आले आहेत हें लक्षांत ठेवा.'

## पहिला भारतीय ध्वज

१९०७ च्या १८ ऑगस्टला जर्मनींत स्टूटगार्ड येथें 'इंटरनॅशनल सोशॅलिस्ट कॉन्फरन्स' भरली होती. या परिषदेला हिंदी क्रांतिकारकांच्या वतीनें कामाबाई व सरदारसिंग राणा यांनीं उपस्थित राहावें असें ठरलें. परिषदेला निरनिराळ्या राष्ट्रांचे सुमारें हजार प्रतिनिधि आले होते. या परिषदेंत हिंदुस्थानसंबंधींचा ठराव मांडण्याची कामगिरी कामाबाईंनीं पत्करली. ठराव मांडायला कामाबाई जेव्हां व्यासपीठावर उभ्या राहिल्या तेव्हां सारें सभागृह बाईकडे कुतूहलानें व आदरानें पाहूं लागलें. बाई यावेळीं निव्वळ बोलायला आल्या नव्हत्या. त्यांच्या सतेज अशा करारी मुद्रेवर कांहीं संकल्प झळकत होता. ठराव मांडण्यापूर्वी त्यांनीं साडीच्या पदराखालून एक गुंडाळी काढून **स्वतंत्र भारताचा तिरंगी ध्वज** प्रथमतःच त्या परिषदेंत फडकवला. तो ध्वज बघून सभागृहांत टाळ्यांचा कडकडाट झाला. हिरव्या, केशरी व तांबड्या रंगाचा, सूर्यचंद्राच्या व अष्टकमलांच्या आकृतींनीं विशोभित केलेला आणि 'वंदेमातरम्' या अक्षरांनीं पावन झालेला तो ध्वज म्हणजे भारतीय स्वातंत्र्याची धगधगती मशालच भासली सर्वांना.

हा ध्वज फडकविल्यानंतर बाईंनीं खणखणीत आवाजांत पुढील आशयाचा ठराव मांडला.—

'भारतांतील इंग्रजांचें राज्य तेथील जनतेच्या दृष्टीनें अत्यंत अहितकारक व अन्यायकारक आहे. जगांतील स्वातंत्र्यप्रेमी बांधवांनीं इंग्रजांच्या गुलामींत खितपत पडलेल्या भारताला मुक्त करण्यासाठीं पुढें यावें. जुलमी राज्यसत्ते-खालीं समाजवादी राष्ट्र कधींहि उदयाला येणार नाहीं.' हा ठराव मांडल्यावर बाईनीं जें भाषण केलें तेंहि असेंच सडेतोड व जहाल होतें. जमलेल्या प्रति-निधींना 'तुम्ही न्यायाचा कैवार घ्या आणि यापुढें प्रत्येक समाजवादी अधिवेशनांत भारताचें गाऱ्हाणें मांडा.' अशा शब्दांत आवाहन करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

## स्वातंत्र्य घ्यावें लागतें !

१९०८ साल उजाडतांच लंडनमध्यें १८५७ च्या स्वातंत्र्यसमराचा वाढदिवस साजरा करण्याची सावरकरांना कल्पना सुचली आणि त्यांनीं मे महिन्यांत तो समारंभ मोठ्या प्रमाणावर घडवून आणला. या समारंभाचे अध्यक्ष दे. भ. राणा पॅरिसहून मुद्दाम आले होते. कामाबाई कांहीं अडचणी-मुळें येऊं शकल्या नाहींत. पण राणाजींबरोबर त्यांनीं एक स्फूर्तिदायक संदेश पाठवला व हुतात्म्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गोळा होणाऱ्या निधीसाठीं वैयक्तिक ७५ रु. ची देणगीहि दिली. कामाबाईचा हा संदेश असा होता–'भारतीय युवकांनो, भूत आणि भविष्य यांच्या सीमारेषेवर तुम्ही उभे ठाकला आहांत. ध्येय सिद्ध होवो वा न होवो, पण तत्त्वनिष्ठेनें प्रेरित होऊन तुम्ही भारताच्या स्वातंत्र्यासाठीं लढत राहा. ध्येय तुमच्या दृष्टिपथांत येईल. कदाचित् मरतां मरतांहि तुम्हांला तें गवसेल. पण एक गोष्ट ध्यानांत ठेवा. स्वातंत्र्य मिळत नसतें, तें घ्यावें लागतें. युवकांनो, डोळे उघडा, डोळसपणानें वागा. भारतांत आगेकूच करणाऱ्या तुमच्या लक्षावधि बांधवांची हांक ऐका. ज्यांनीं स्वदेशांत हौतात्म्य पत्करलें ते खरोखर धन्य आहेत. मातृभूमीसाठीं ज्यांनीं सर्वस्वाचा होम केला त्यांच्याविषयीं आपल्याला कृतज्ञता वाटल्यावांचून कशी राहील ?'

त्या सालच्या अखेरीस कॅक्स्टन हॉलमध्यें दे. भ. बिपिनचंद्र पाल यांचीं तिकिटें लावून व्याख्यानें झालीं होतीं. त्या प्रसंगीं कामाबाईनींहि एक व्याख्यान दिलें. व्याख्यानास सुरुवात करण्यापूर्वीं जवळ असलेला तिरंगी ध्वज त्यांनीं तेथेहि फडकविला. २० डिसेंबरला इंग्लंडमधील हिंदी लोकांची एक परिषद्

कै. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. कामाबाई व राणा या परिषदेला पॅरिसहून मुद्दाम आले होते. परिषदेंत वीर सावरकरांचेहि एक भाषण झालें. कामाबाई बहिष्काराच्या ठरावावर बोलल्या.

## तें वेळापत्रक जमतें तर—

इंग्रजी राजवटीविरुद्ध सशस्त्र क्रांतीच्या उठावणीचे प्रयत्न केल्याबद्दल सरकारने वीर सावरकरांना जेव्हां अटक केली तेव्हां त्यांच्या सुटकेसाठीं ज्यांनी ज्यांनी यत्न केलें त्या सर्वांत कामाबाई पुढे होत्या. अटकेपूर्वी सावरकर एकदा पॅरिसला गेले होते तेव्हां त्यांचा मुक्काम अर्थातच बाईकडे होता. सावरकर लंडनला जातांच पकडले जाणार याची त्यांना कल्पना होती. जुलै १९१० मध्यें बंदिवान सावरकरांना 'मोरिया' बोटीने हिंदुस्थानकडे नेत आहेत या गोष्टीचा सुगावा लागून कामाबाई, अय्यर प्रभृति लोकांनीं मार्सेलिसला त्यांच्या सुटकेसाठीं एक धाडसी योजनाहि आंखली. पण बोटीचें आगमन, सावरकरांचें अद्‌भूत पलायन आणि कामाबाई प्रभृतीचें मार्सेलिसला आगमन यांचें वेळापत्रक दुर्दैवाने चुकले आणि त्यांचे यत्न फसले. पुढे या दुर्दैवी घटनेची जेवढी प्रसिद्धि करतां येईल तेवढी मात्र त्यांनी भरपूर केली. मार्सेलिसहून सावरकरांना घेऊन बोटीनें जेव्हां प्रयाण केलें तेव्हां बॅ. बॅप्टिस्टांना बाईनी लगोलग पुढील तार केली:—' See immediately professionally Savarkar arriving Bombay Steamer Morea. French Govt. demands his return. Choose your solicitor. Letter follows.

## सावरकरांना नितांत आदर

दुर्दैवाने बाईंचे आणि इतर साऱ्यांचे यत्न निष्फळ ठरून सावरकरांना दोन जन्मठेपेची शिक्षा झाली. यानंतर क्रांतिकारकांच्या हालचाली मंदावल्या. कामाबाई पॅरिसमध्यें एकाकी अवस्थेंत दिवस कंठू लागल्या. चौदा सालच्या महायुद्धाच्या काळांत इंग्रजांच्या मर्जीखातर फ्रेंच सरकारने कामाबाईना कांही दिवस अटकेंत ठेवलें होतें. पण हा कारावास त्यांना फार काळ भोगावा लागला नाही. सुटका झाल्यावर त्या पॅरिसमध्येंच राहिल्या. वीर सावरकरांचे आणि त्यांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे व विश्वासाचे होते. 'अंदमानच्या अंधेरींतून' सावरकर आपल्या धाकट्या बंधूंना जीं पत्रें

पाठवत त्यांत ते कामाबाईंची आस्थेने चौकशी करीत. कामाबाईंची योग्यता सावरकरांच्याच शब्दांत वाचणें योग्य होईल. ‘ फ्रान्सवरील जर्मनीच्या स्वारी-मुळें मॅडम कामांकडची कांहीहि वार्ता कळणें अशक्य झालें असेल अशी मला भीति वाटत होती. मी येथें आल्यापासून त्या तुला दुसऱ्या आईच्या जागीं झाल्या आहेत आणि आयुष्यांतल्या अत्यंत कष्टमय प्रसंगीं त्यांनी नितान्त मोठेपणानें आणि संबंधांना स्मरून आपल्याला साहाय्य केलें आहे. असल्या एका निष्ठावंत, उदारचरित, निर्भर आणि प्रेमळ हाताच्या स्पर्शाबरोबर प्रियतमाच्या औदासीन्याने विश्वासस्थानांच्या विश्वासघातानें आणि आप्तांच्या अदर्शनानें उन्मळून टाकलेला मनुष्याच्या अंतःकरणांतील मनुष्यजातीविषयींचा विश्वास पुनः सुस्थिर होतो. त्या प्रेमाच्या जीवाला मला पत्र पाठवतां येत नाही आणि त्यांच्या उदात्त चारित्र्याविषयींच्या नि दीन आणि आर्त ह्यांच्यासंबंधीच्या आस्थेविषयी मला किती आदर वाटतो! आणि पुनः एकदा त्यांचें दर्शन व्हावें म्हणून मी किती उत्कंठित झालों आहे हे त्यांना सांगतां येत नाहीं ह्याचा मला खेद होतो. तेव्हां तूंच आपल्या कोणाहि आप्ताच्या आधीं त्यांना माझे सादर प्रणाम पोंचते कर. ’

अशी ही उदारचरित वीरांगना पॅरिसच्या घरांत सहकाऱ्यांच्या आठवणी काढीत आणि स्वतंत्रतेसाठीं झुरत जवळजवळ पस्तीस वर्षे अज्ञातवासांत काळ कंठीत होती. इंग्रज सरकारनें कामाबाईंना हिंदुस्थानांत पाऊल टाकूं दिलें नाही. राजकारणांत भाग न घेण्याची अट त्यांच्यावर लादून मगच त्यांना मातृभूमीवर पाय ठेवूं दिला! कामाबाई वृद्धावस्थेंत दिवस मोजीत होत्या. १९३४ सालीं त्या मायभूमीला परतल्या आणि आजारी पडून १६ ऑगस्ट १९३६ रोजीं मुंबईला पार्शी जनरल हॉस्पिटलमध्यें निधन पावल्या. पॅरिसमध्यें मूकपणें जागणारी ही वृद्ध वीरांगणा हिंदुस्थानांतसुद्धां मूकपणेंच मृत्यू पावली. तिची स्मृति सदैव जागृत होण्याच्या दृष्टीनें स्वतंत्र भारत मुंबईत तिचें एखादें स्मारक उभारील काय?

म. ग्रं. सं. ठाणें, ग्रंथालय शाखा,
BVBK-0401290 ९२८० ८८८७